म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. ७०८४




BVBK-0401784

वाच. बा. वा
१०८४
३।५।८५

# पावसाचा मंत्र

## ( किशोरांसाठी कथासंग्रह )

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. १०८४ दिनांक ३।५।८५
विषय बाबा

लेखिका :
सौ. कविता गुपचूप

BVBK-0401784

निहारा प्रकाशन – पुणे २

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळाले आहे.

प्रकाशक :
सौ. स्नेहसुधा कुलकर्णी
निहारा प्रकाशन
५३४ बुधवार पेठ, पुणे- २

मुद्रक :
राजेंद्र जोशी
प्रताप प्रिंटर्स
११७३ बुधवार पेठ, पुणे २

मूल्य
रु. सहा

मुखपृष्ठ :
रमेश भारताल–पुणे

प्रकाशन क्र.
१८

प्रथमावृत्ती :
जुलै १९८४

# दोन शब्द :

मी गेली ७/८ वर्षे सातत्याने कुमारांसाठी कथा लिहित आहे. सदरच्या कथा कुमार मासिकातून वेळोवेळी छापून आल्या आहेत. परन्तु पुस्तक रुपाने प्रथमच प्रकाशित होत आहेत. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची मी आभारी आहे.

या संग्रहातील कथा कुमारांच्या मनावर चांगले संस्कार घडवतील अशी आशा आहे.

— कविता गुपचूप

कथानुक्रम --

१) पावसाचा मंत्र
२) की वर्डस्
३) नाटक
४) खरी संपत्ती
५) असाही चोर
६) पण पंख फुटलेच नाहीत
७) ढाण्या

# पावसाचा मंत्र

म. ग्रं. सं. ठाणे, आगत क्र. .......
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ९०८४ दिनांक ३।५।८५
विषय कथा क्र. ........

# पावसाचा मंत्र

बंटी आणि खंडू एकाच शाळेत, एकाच वर्गात शिकत होते. दोघेही हुषार होते. कधी याचा पहिला नंबर तर कधी त्याचा. बस इतकंच दोघांच्यातलं साम्य. बाकी मग दोघं दोन ध्रुवावर होते. बंटी खूप श्रीमंत होता. त्याचा मोठा बंगला होता. त्याच्या बंगल्याच्या मागे झोपडपट्टी होती. तिथंच खंडू राहत होता. उघड होतं. खंडू फार गरीब होता. त्याचे कपडे, त्याची वह्या–पुस्तकं, त्याची वागणूक साऱ्यातून जणू त्याचं दारिद्र्य ओसंडत होतं. असला मुलगा अभ्यासात आपली बरोबरी करतो याची बंटीला विलक्षण चीड यायची. त्यामुळे खंडूबद्दल त्याच्या मनात असलेला तिरस्कार वाढतच होता. तो सतत खंडूशी भांडण उकरून काढी. त्याचा अपमान करायची संधी हुडकून काढी. गोरागोमटा. उंची कपड्यांनी ऐटीत राहणारा, रोज स्वतःच्या गाडीतून शाळेत येणारा बंटी, सहजपणे सगळ्या मुलांना आपल्या बाजूला वळवून घेई. खंडू बिचारा वर्गात एकटा पडे. सगळ्या मुलांची कुजकी नासकी बोलणी मुकाटपणे सहन करीत तो शाळा शिकत होता.

खंडू आणि बंटी या वर्षी आठवीत गेले होते. बंटीचा या वर्षी पहिला नंबर आला होता आणि खंडूचा दुसरा.

नवीन वर्षाची शाळा सुरू झाली. खंडूचा अभ्यास वाढला. त्याबरोबरच त्याचं घरातलं कामही वाढलं. त्याला एक छोटा भाऊ झाला होता. त्या बाळाचं आवरून त्याची आई कामाला जाई. मग छोट्याला सांभाळायचं काम खंडूलाच करावं लागे. त्यामुळे शाळेत वेळेवर यायचं म्हणजे खंडूला रोजच शर्यत करावी लागे. बसनं यायची त्याची ऐपत नव्हती. त्याच्याजवळ सायकल असणं ही गोष्ट तर स्वप्नातही शक्य नव्हती.

एके दिवशी असाच खंडू धापा टाकत वर्गात पोहोचला. समोरच बंटी होता. तो वर्गातल्या सगळ्या मुलांना म्हणाला. ' हे आले राजाधिराज. म्हणून तर सगळ्यांच्या शेवटी येतात. यांचं नाव माहित आहे ? महाराज भिकारडे राजे.' असं म्हणून तो जोरजोरात हसू लागला. त्याच्याबरोबर इतरही मुलं हसू लागली. काय बोलावं तेच खंडूला कळेना. बंटीचं आपण काय वाकडं केलंय म्हणून तो असा अपमान करतो ते त्याला समजत नव्हतं. बिच्चारा, आधीच तो इतका दमला होता की म्हटलं असतं तर काही उत्तर देण्याचं त्राण त्याच्यात नव्हतं. मुकाटपणं तो बाकावर बसला.

शाळा सुरू झाली आणि बरोबरच पावसाळाही. नेहमी-प्रमाणे तो सुरू झाला. पण नेहमीसारखा मात्र नाही. पाऊस जो सुरू झाला तो मुळी थांबतच नव्हता. सतत आणि जोरदार पावसामुळे नदीचं पाणी खूप वाढलं. झपाट्यानं ते आजूबाजूला पसरत होतं. संध्याकाळच्या वेळी खंडूच्या झोपडपट्टीत ते शिरू लागलं. खंडू आणि त्यच्या आई–वडिलांना पावसात भिजायची, ओले कपडे अंगावर वाळवायची सवय होती. पण घरातलं ते छोटं

वाळ ? त्याचाच प्रश्न होता. शिवाय दोन–तीन दिवसांपासून त्याला ताप येत होता. असल्या मुसळधार पावसातून त्याला कोणत्या सुरक्षित जागी न्यायचं ? इतक्यात खंडूला एक कल्पना सुचली. खरं तर ती अशक्य कोटीतली होती. पण खंडूला मात्र तसं वाटत नव्हतं. तो आईला म्हणाला, ‘ तू सामान आवर. आत्ता पाच मिनिटांत येतो मी.’ तो धावतच बंटीच्या बंगल्याकडे निघाला. आजची रात्र बंटीनं त्याच्या मागच्या व्हरांड्यात काढू दिली तर किती बरं होईल. धो धो पाऊस कोसळतच होता. अंगात उबदार कपडे घालून बंटी खिडकीत उभा होता. खंडू आपल्याच घराकडे येताना पाहून तो घाईघाईनं खाली आला. आणि पोर्च-मध्ये येऊन उभा राहिला. खंडू तेवढ्यात पोचलाच. ‘ बंटी, माझं तुझ्याकडं काम होतं थोडं.’ तो म्हणाला.

‘ माझ्याकडे ? माझ्याकडे कसलं बुवा काम तुमच्या-सारख्या स्कॉलर मंडळींचं ?’ बंटीनं विचारलं.

बंटीच्या वाकड्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला खंडूला वेळच नव्हता. आपल्या कपड्यातून ओघळणारं पाणी निपटायचा प्रयत्न करीत खंडू म्हणाला ‘ पाऊस पाहिलास ना कसा कोसळतोय ? नदीचं पाणी खूप वाढलंय. आमच्या झोपडीत ते झपाट्यानं शिरतंय.’ इतक्यात बंटीचा नोकर दरवाजातून बंटीला हाका मारू लागला. ‘ बंटीसाहेब, बंटीसाहेब, आत या लवकर. बाहेर पावसात भिजलात म्हणजे ? आजारी पडायला होईल.’

खंडूचा बिचाऱ्याचा बंटीच्या पोर्चमध्येसुद्धा शिरकाव होऊ शकला नव्हता. मुसळधार पावसात बिचारा उभा होता. त्याला त्याची विशेष खंत नव्हती. त्याला दिसत होता फक्त त्याचा छोटा भाऊ. कुठेतरी त्याला निवारा मिळाला की बस्स. तो बंटीला

म्हणाला. 'बंटी, आजची रात्र तुझ्या व्हरांड्यात राहू का आम्ही ? माझा छोटा भाऊ आजारी आहे.'

बंटी तातडीनं म्हणाला, 'छे, छे, ते नाही जमायचं. बाबां-कडे सारखी बडी बडी मंडळी येत असतात. आधीच तू दरिद्री, घाणेरडा. त्यात तुझा भाऊ रडून डोकं उठवणार.'

बंटीच्या उत्तरानं खंडूला चीड आली. पण इलाज काय होता ? तो म्हणाला, 'बंटी, व्हरांडा तर मागे आहे. शिवाय माझा भाऊ रडत नाही.'

'पण नाही जमायचं. तू आपला कॉर्पोरेशनच्या शाळेत जा ना. तुम्हा लोकांची तिथे सोय केलीय. शिवाय जेवणखाण मिळेल फुकट. निदान चार दिवस तरी पोटभर खाशील तू.'

इतक्यात बंटीचा नोकर पुन्हा हाका मारू लागला. बंटी मागे फिरला: तो नोकरावर ओरडला 'काय रे भिक्या, कशाला हाका मारीत होतास ? तुला एवढी अक्कल नाही, मी आत आलो असतो तर तोही त्याचे घाणेरडे चिखलाचे पाय घेऊन आत आला असता. मुर्ख कुठला.'

खंडूने सारं ऐकलं. इतका अपमान. जनावरांपेक्षासुद्धा कमी प्रतीची वागणूक. त्याच्या डोळ्यात पाणी उभं राहिलं. कधीतरी या बंटीची जिरवण्याची संधी मला नाही का मिळणार ? माझ्या-सारखं दुःख त्याला एकदा तरी भोगायची पाळी आली पाहिजे. तरच त्याचा उर्मटपणा कमी होईल.

वरुन कोसळणारा पाऊस, रस्त्यातून वहाणारं गुडघा गुडघा पाणी, डोळ्यांतून वहाणारं पाणी, आणि डोक्यातले विचार, यामुळे झोपडीत शिरल्यावर खंडूच्या लक्षात आलं. त्याच्याही झोपडीत गुडघाभर पाणी चढलंय. सगळी मंडळी कधीच निघून

गेली आहेत. सगळी झोपडपट्टी ओसाड पडली होती. तो मागे फिरला आणि अचानक एक मोठा लोंढा आला. खंडू त्याच्याबरोबर वाहू लागला. खंडू घाबरला. मदतीसाठी तो ओरडू लागला. त्याला पोहता येत होतं. त्यामुळेच केवळ तो लगेच बुडू शकला नाही. आता आपण नक्की मरणार, आपले आई–बाबा आपली वाट पाहतील. आपलं काय झालं तेही बिचाऱ्यांना समजणार नाही. आपण शिकू, मोठे होऊ, मग आई–बाबांचं दारिद्र्य दूर होईल अशी बिचारा आशा करत होता. दुर्दैवी बिचारा !

पण खंडूला वाटत होतं तेवढे त्याचे आई–वडील दुर्दैवी नव्हते. खंडू पाण्याबरोबर वहात चालला होता. मधेच एका प्रचंड वृक्षाजवळून तो वाहू लागला. पटकन खंडूने त्याची फांदी पकडली आणि तो वर आला. आपण खरोखरच वाचलो यावर त्याचा प्रथम विश्वासच बसेना. पण वाढणारं पाणी जेव्हा त्याच्या पायापर्यंत पोचलं, तेव्हा तो भानावर आला. मग मात्र झरझर उंच फांदीवर तो चढून बसला. खालून घोंघावत जाणारं पाणी, वरून कोसळणारा पाऊस, अंधारून आलेली संध्याकाळ, ओल्या चिंब कपड्यातून कुडकुडणारा आणि एकटा–अगदी एकटा असलेला खंडू. कसले कसले विचार त्याच्या डोक्यात चालू होते कोण जाणे.

इतक्यात कसली तरी हालचाल त्याला जाणवली. तो खूपच घाबरला. तो लक्षपूर्वक पहात राहिला. त्याच्या डोळ्यांना अंधाराचा सराव झाला आणि मग त्याला दिसलं, एक भला मोठा बेडूक त्याच्याच फांदीवर बसला होता. याला दुसऱ्या फांदीवर हुसकावलं पाहिजे. नाहीतर याच्या पाठोपाठ सापही यायचा. खंडूने एक बारीकशी फांदी घेतली आणि तो बेडकाला हुसकावू लागला. इतक्यात आवाज आला, ‘ का रे मुला, का असा दुष्टपणा

करतोस ? मला पाण्यात टाकायचा विचार दिसतोय तुझा ? मी केलंय काय तुझं असं !'

बापरे, हा बेडूक भूत बीत तर नाही ? चक्क माणसासारखा बोलतोय. खंडू खूपच घाबरला. तो म्हणाला, 'बेडूकदादा, कृपा करून गैरसमज करून घेऊ नकोस. मी तुला पाण्यात पाडणार नव्हतो. फक्त तुला दुसऱ्या फांदीवर हुसकावणार होतो. मला बेडकाची फार भीती वाटते. मी मुळीच दुष्ट नाही रे.'

'ठीक आहे मग', बेडूक म्हणाला.

'पण एकूण मुक्या प्राण्यांना त्रास देणं वाईटच'. बेडकाचं सौम्य बोलणं ऐकून खंडूला जरा धीर आला, तो म्हणाला, 'बेडूक दादा, तुला बोलता कसं येतं रे ? का तू जादूचा बेडूक आहेस ?'

'छे छे, जादू वगैरे काही नाही, पावसाची नक्षत्रं असतात, हो की नाही ? सध्या जे नक्षत्र चालू आहे, त्याचं मी वाहन आहे. म्हणून ते नक्षत्र असेपर्यंत मला बोलता येईल.' बेडूक म्हणाला.

'तर मग बेडूकदादा, हा असा धुंवाधार पाऊस कोसळतोय. आम्हा गरिबांचे किती हाल होताहेत. हा पाऊस नाही का तुला थांबवता येणार ?' खंडूनं विचारलं.

'अं हं, हा पाऊस नाही मला थांबवता येणार. मला फक्त पाऊस पाडता येतो आणि तोच तेवढा थांबवता येतो.' बेडूक म्हणाला.

'मग तर फारच उत्तम. जिथं दुष्काळ असेल तिथं तू पाऊस पाडत जा' खंडूनं सुचवलं.

'माझी ही शक्ती फार मर्यादित आहे. मी मंत्र म्हटला की माझ्या दृष्टीला जेवढं दिसतं तेवढ्याच भागात पाऊस पडतो.' बेडकानं सांगितलं.

हे ऐकून खंडूच्या मनात एक नामी कल्पना आली. त्यानं विचारलं, 'काय रे बेडूकदादा, हा मंत्र तू दुसऱ्या कुणाला देऊ शकतोस का रे ?'

'का रे बाबा, तुला हवा आहे वाटतं हा मंत्र, म्हणजे मग जास्तच दुष्टपणा करायला बरं' बेडूक म्हणाला.

'छें छें, बेडूकदादा, मी दुष्ट नाही. मी एक गरीब मुलगा आहे. मी कसला दुष्टपणा करणार ? पण मला मंत्र मात्र हवा आहे.' खंडू म्हणाला.

'कशाला हवा आहे ?' बेडकानं विचारलं.

मग खंडूनं त्याला बंटीची सगळी हकीगत सांगितली. बंटीला एकदा धो धो पावसात भिजवला म्हणजे त्याला कळेल गरिबाचं दुःख. मग तो असा दुष्टपणानं वागणार नाही.

खंडूचं म्हणणं बरोबर होतं. श्रीमंत गरिबांशी तुच्छतेनं वागतात याचं महत्वाचं कारण त्यांनी गरिबांची दुःख कधी अनुभवलेली नसतात, 'ठीक आहे खंडू. मी तुला हा मंत्र देतो. पण एक गोष्ट लक्षात ठेव. तू जर वाईट गोष्टीसाठी याचा वापर केलास तर तो तुझ्यावरच उलटेल. ज्या नक्षत्रामुळं मला हा मंत्र मिळाला आहे ते परवा बदलणार आहे. तेव्हा या मंत्रचा उपयोग तुला फक्त उद्यापर्यंत करता येईल.'

खंडूला अत्यानंद झाला. बेडकानं सांगितलेला मंत्र त्यानं तोंडपाठ केला. बंटीला आता कसा धडा शिकवायचा या विचारात तो गुंगून गेला. पाऊस कधी संपला आणि पहाट कधी झाली हे त्याला कळलंही नाही. दुसरा दिवस उगवला तो अगदी चकचकीत. पावसानं सगळं धुवून स्वच्छ केलं होतं. त्यावर पडलं होतं सूर्याचं कोवळं, सोनेरी उन. बघताना किती आनंद होत होता. खंडू घरी

परतला. घरी गेल्यावर जमीन साफसूफ करायला त्यानं आईला मदत केली. आणि मग छोट्या बाळासाठी दुध आणायला तो बाहेर पडला.

वाटेत त्याला बंटी दिसला. त्यानं बंटीला हाक मारली. पण बंटीनं लक्षच दिलं नाही. खंडूनं त्याला पळत जाऊन गाठलं. ' बंटी, अरे, किती हाका मारायच्या ?' खंडू म्हणाला.

' काय काम आहे आता ?' बंटी रागावला होता.

' काम असलं तरच बोलायचं असं थोडंच आहे? अरे आपण वर्गबंधू आहोत.' खंडू म्हणाला.

' वर्गबंधू वर्गात. इथं रस्त्यात त्याचा काय संबंध ?' बंटी चिडला.

' हेच विचारायचं होतं मला. तू माझा सारखा अपमान का करतोस, मी काय केलंय तुझं ?'

' मग काय तुझ्यासारख्या भिकारड्याशी मैत्री करू ?'

' हे बघ बंटी, गरिबांची दुःख तुला समजली तर तू असा वागणार नाहीस.' खंडू म्हणाला

' काहीं गरज नाही त्याची,' असं म्हणून बंटी चालू लागला.

खंडूनं आपलं अस्त्र बाहेर काढलं, त्यानं पावसाचा मंत्र जपला आणि तो बंटीकडे पहात राहिला. त्याक्षणी बंटीच्या अंगावर धो धो पाऊस कोसळू लागला. तो चकितच झाला. चकचकीत उन पडलेलं. ढगांचा कुठे पत्ता नाही. आणि तरी हा जोरदार पाऊस. त्याला चालणं मुश्कील झालं. श्वास घेताना तो घावरा होत होता. खंडूकडं त्यानं पाहिलं. इतक्या जवळ असूनही त्याच्या अंगावर एक थेंबही पाऊस पडत नव्हता. कसाबसा बंटी घरी गेला. बंटीचा अवतार पाहून त्याच्या आईला आश्चर्य वाटलं. ' हे काय

बंटी, इतका कशानं भिजलास ?' आईनं विचारलं ?'

'अगं पाऊस नाही का पडला ?' बंटी म्हणाला.

'काय वेड बीड लागलं काय रे बंटी ? बाहेर बघ कसं ऊन पडलंय.' आईच्या बोलण्यावर बंटीनं काही उत्तर दिलं नाही. या पावसामागे खंडूची काही तरी चलाखी असली पाहिजे असं त्याला वाटत राहिलं.

खंडू शाळेत गेला. आज बंटी शाळेत आलाच नव्हता. बंटी सकाळच्या पावसानं आजारी तर पडला नसेल ? खंडूला काळजी वाटायला लागली. शिवाय बंटी काही धडा शिकला कीं नाही हे-ही त्याला पहायचं होतं. मधली सुट्टी झाली. खंडू सरळ बाहेर पडला तो बंटीच्या घरी. तो एकदम आत शिरला आणि बंटीच्या खोलीत गेला. बंटी गरम कपडे घालून, पांघरूण घेऊन पलंगावर वाचत पडला होता. अचानक खंडूला दारात बघून तो भडकलाच. 'माझ्या खोलीत कसा आलास तू ?' बंटी ओरडला.

'मित्रा, तुझी प्रकृती बघायला. शिवाय तुझ्यात काही बदल झालाय का ते पहायला' खंडू म्हणाला.

सकाळी सगळाच चमत्कार झाला होता. खंडूने सगळ्यांना ही लाजिरवाणी गोष्ट सांगितली असेल तर ? म्हणून बंटी आज घरीच राहिला. त्याच्या अपमानाचा एकमेव साक्षीदार होता खंडू. 'चालता हो आलास तसा.' बंटी म्हणाला.

'घाबरू नकोस बंटी. मी काही इथं रहायला आलो नाही. एकदा तरी तुला माझ्यासारखं दु:ख अनुभवायला लावायचं असं मी ठरवलं होतं. माझी खात्री आहे, तू मग असा उद्धटासारखा वागणार नाहीस.' खंडू म्हणाला.

'ताबडतोब चालता हो इथून. नाही तर मी नोकराला हाक मारीन.' बंटी म्हणाला.

त्याला उत्तर म्हणून खंडू पावसाचा मंत्र पुटपुटू लागला. आणि बंटीकडे पहात राहिला. तत्क्षणी जोरदार पाऊस बंटीच्या अंगावर कोसळू लागला. बंटीचे कपडे, त्याची गादी, वह्यापुस्तके सारं भिजून चिंब झालं पाऊस जोरदार पडत होता. खोलीत पाणी साठलं. ते वाढू लागलं. पण नवल असं ते खोलीबाहेर जात नव्हतं. खोलीत पूर येऊ लागला. खंडू दारात उभा होता. जोरदार पावसामुळे बंटीला हालचाल करणं, श्वास घेणं कठीण झालं होतं. शिवाय पळायचं तर दाराशीच खंडू, खंडूची त्याला फार भीती वाटत होती.

खोलीतला पूर वाढतच होता. घोटयाच्या वर चढून पाणी गुडघ्याइतकं खोलीत साठलं. मग गुडघ्याचं पाणी चढून कमरेइतकं आणि मग छातीएवढं झालं खंडू बंटीकडं पहात होता. पाऊस तसाच कोसळत होता. पाणी वाढत होतं. बंटी खूपच घाबरला पाणी हळू हळू बंटीच्या गळ्यापर्यंत चढलं. तो केविलवाणेपणाने म्हणाला, 'खंडू, बस कर तुझा पाऊस. तूही असाच एकदा पुरात अडकला होतास त्याची आठवण कर. म्हणजे मग माझी अवस्था तुला कळेल.'

'बंटी, हे तू मला शिकवायला नकोस. अरे, हे तर आमचं रोजचं आयुष्य. तुझ्याशी त्याची ओळख व्हावी म्हणून तर हा पाऊस.' खंडू म्हणाला.

'खंडू, मला तुझ्या आयुष्याची चांगली कल्पना आली. तुझ्याशी वाईट वागल्याबद्दल मला माफ कर.'

बंटीचं हे बोलणं संपताच पाऊस थांबला. खोलीतलं पाणी

ओसरू लागलं. खंडूनं बंटीला कपडे बदलायला मदत केली. कपडे पुस्तकं त्यानं आवरून टाकली.

बंटीनं विचारलं, ' खंडू एक गोष्ट खरीखरी सांगशील ? हा पाऊस पाडायला तू कसा शिकलास ?'

' ते मी तुला नंतर सांगतो. तू आता आराम कर मी पण शाळेत पळतो.' असं म्हणून खंडू घाई घाईनं शाळेत निघून गेला.

◊

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. 9068 दिनांक 3।5।09
विषय बाल क्र. ........

# की वर्डस

बाळु हेडसरांच्या खोलीतून बाहेर पडला. शक्य तितक्या हळू हळू तो वर्गाकडे जाऊ लागला. पण असा कितीसा वेळ लागणार वर्गात पोहचायला ? समोरच वर्ग होता. पट्ट्या मारलेल्या वेदना हातावरच ठेवीत, बाळूनं डोळे कोरडे केले. तोंडावर बळेच हसू आणीत तो वर्गात शिरला. समोरच बिट्ट्या होता. ‘बिट्ट्या लेका, अरे आपल्या वर्गात आता कोण येणार आहे माहित आहे का ? साक्षात शिवाजी महाराज.’ बिट्ट्याला न पाहिलेल्या शिवाजीपेक्षा समोर दिसणाऱ्या बाळूत जास्त रस होता. तो म्हणाला, ‘पण बाळू, तू कशाला गेला होतास हेडसरांकडे ?’ बाळूच्या चेहऱ्याकडे पाहून कुणालाही कारण कळण्यासारखे होते. आणि त्यातल्या त्यात सातवी क च्या कोणत्याही मुलानं हेडसरांकडे जाणं याचा अर्थ एकच होता. आधीच हात दुखत होता आणि त्यात बिट्टूनं असं जखमेवर मिठ चोळलेलं पाहून बाळू पण वैतागला. ‘बिट्ट्या, हेडसरांकडे कशाला जातात हे तुला माहित नाही का ? आणि जसा काही तू कधी त्यांच्याकडे गेलाच नाहीस ?’

बाळूनं चक्क खरंखरं बाहेर काढल्यावर ब्रिट्टूला जास्त बोलताच येईना. त्याने लगेच विषय बदलला. शिवाजी महाराजांबद्दल मग तो जास्त माहिती विचारू लागला. बाळूनं मग शिवाजीची हकीगत रंगवून सांगितली. शिवाजी केणे इतके दिवस खेडयातच शिकत होता. आता वडिलांची बदली झालीय म्हणून तो शहरात आलाय. एरंडासारखा उंच वाढलाय. पण अजून हाफपँटीतच आहे आणि डोक्यावर चक्क टोपी घातलीय. त्याचे वडील सांगत होते, शिवाजी फार हुशार आहे. त्याला क तुकडीत बसवू नका. अ तुकडीत बसवा. आणि शिवाजीच्या ओठावर चक्क बारीक बारीक मिशा उगवल्यात.

बाळूचं वर्णन ऐकण्यासाठी त्याच्याभोवती वर्गातल्या मुलांचा घोळका जमला होता. सातवी क तली सगळी मुले केव्हा ना केव्हा नापास होऊन या वर्गात भरती झाली होती. त्यामुळे वयानं ती थोडी मोठी होतीच. दंगा करण्यात त्यांचा पहिला नंबर. कुठलाही विषय समजावून देता देता त्यांच्या प्रत्येक शिक्षकाच्या नाकी नऊ येत. शिक्षकांची सुद्धा टिंगल टवाळी करण्यात सगळी मुले हिरीरीनं भाग घेत. हेडसरांच्या छडया एकानं तरी खाल्ल्या नाहीत असा एकही दिवस जात नव्हता. आणि अशा मुलांच्या हातात शिवाजी म्हणजे एक नवीनच खेळणं मिळालं होतं. शिवाजी वर्गात येण्यापूर्वी योजना आखली गेली. कुणी कुणी काय काय म्हणायचं, कुणी कसं वागायचं हे सगळं ठरलं. इतक्यात वडिलांबरोबर शिवाजी येताना बाळूला दिसला. तोच फक्त त्याला ओळखत होता. बाळूनं इशारा केला त्याबरोबर सगळी मुलं शांत बसली. अगदी हाल नाही की चाल नाही. शिवाजी आणि त्याचे वडील वर्गापाशी पोहोचले. पण कुणी त्यांच्याकडे पाहिले पण

नाही. वडील शिवाजीला म्हणाले, ‘ जा, आता तू वर्गात जाऊन बैस. इतक्यात शाळा सुरू होईल.’ वडील माघारी फिरले आणि शिवाजीने वर्गात प्रवेश केला, त्याबरोबर कोपऱ्यातून आवाज आला, ‘ क़ोण रे तो ?’ त्याच्या शेजारून आवाज आला, ‘ कोण तो?’ त्याच्या शेजारून आवाज आला, ‘कोण रे तो ?’ सगळी मुलं चूपचाप बसली होती. नाकासमोर पहात होती. ओळीनं पाढा म्हणावा तसं मात्र त्यांचं ओळीत चाललं होतं. ‘ कोण तो, कोण तो, कोण रे तो ?’ शिवाजी बिचारा बावरून दाराशीच थबकला. शेवटच्या मुलावर पाळी आली तसा तो म्हणाला, ‘ मी आहे शिवाजी महाराज.’ आणि मग हास्याचा कल्लोळ उठला. पुन्हा कोपऱ्यातून सुरुवात झाली, ‘ अर्धी अर्धी काय काय?’ प्रत्येक मुलानं हे वाक्य म्हटल्यावर शेवटचा मुलगा म्हणाला, ‘ अर्धी अर्धी काय विचारता ? अर्धी अर्धी पॅण्ट.’ मग तर हसण्याला ऊत आला. शिवाजी बिचारा बावचळून गेला. आपण वर्गात जावं की परत फिरावं हे त्याला कळेना. पुन्हा कोपऱ्यातून सुरुवात झाली. ‘ छोटया छोटयाला काय काय ?’ पुन्हा ओळीनं पाढा सुरू झाला. शेवटच्या मुलावर पाळी आली तेव्हा तो म्हणाला, ‘ छोटया छोटया मिशा.’ पुन्हा एकदा हास्याचा कल्लोळ, बाकावर आवाज करणं. शिवाजी तर बिचारा या स्वागतानं अगदी भांबावून गेला आणि मागे फिरला. इतक्यात घंटा झाली. मग वर्गात शिरणं शिवाजीला भागच होतं. बळी दिल्या जाणाऱ्या पशूसारखी त्याची अवस्था झाली. शिवाजी आत शिरला. तिसऱ्या बाकावर एक मुलगा बसलेला होता. शिवाजी त्याच्याशेजारी जाऊन बसला. त्याबरोबर तो मुलगा उठला आणि दुसऱ्या बाकावर जाऊन बसला. शिवाजी बिचारा शरमून गेला. तो मुकाटयाने उठला आणि मागे गेला.

मागच्या बाकावर तो बसला. त्याबरोबर शेजारचा मुलगा उठून गेला. शिवाजीला समजेचना काय करावं आणि कसं वागावं. इतरांपेक्षा त्याचा पोषाख वेगळा होता त्यामुळे त्याला मनातल्या मनात शरम वाटत होती. सगळ्या मुलांनी फुलपँट घातली होती. ऐटबाज भांग पाडले होते. स्वत:ची त्यांच्याबरोबर तुलना करताना तो गोरामोरा झाला. इतक्यात वर्गात शिक्षक आले. त्यामुळे शिवाजीची तात्पुरती का होईना, मुलांच्या कचाटयातून सुटका झाली. शिक्षकांनी त्याची चौकशी केली आणि मग अभ्यासाला सुरुवात झाली. शिवाजी मन लावून शिकत होता. इतरांच्या मात्र शिक्षकांची नजर चुकवून टिवल्या बावल्या चालल्या होत्या. शिवाजीच्या खोडया काढण्यात तर सगळयांना विलक्षण आनंद वाटत होता.

ज्या दिवशी शिवाजी मधल्या बाकावर बसे त्यादिवशी अनेकवार त्याची टोपी मागून कुणीतरी उलटून टाकी. मग त्याचे तोकडे केस आणि शेंडी उघडी पडायची. इतर मुलांप्रमाणे भांग पाडावा तर निदान महिनाभर तरीं वाट पहावी लागणार होती. इतरांप्रमाणे कपडे करायलाही त्याला महिना दोन महिने थांबावे लागणार होते. त्याचे वडील गरीब होते. सगळ्या मुलांना एकटयानं तोंड देणे शिवाजीला शक्य नव्हतं. तेव्हा समंजसपणे रोजच्या 'क़ोण तो' कडे आणि इतर खोडयांकडे दुर्लक्ष करायचं त्याने ठरवलं. अभ्यास मात्र मन लावून करायचा असा त्यानं निश्चय केला.

दिवस भरभर उलटत होते. सातवी क चा रोजचा क्रम चालूच होता. नेहमीप्रचाणे परीक्षा आटोपल्या आणि रोज कुठल्या ना कुठल्या विषयाचे मार्क्स कळू लागले. गणित, इंग्रजी, शास्त्र

या विषयात तर सगळी मुलं नापास झाली होतीच. पण इतिहास भूगोलसारख्या सोप्या विषयातही बहुसंख्य मुलं नापास होती. शिवाजीनं मात्र प्रत्येक विषयात चांगले मार्क पाडून अ तुकडीतल्या मुलांशी बरोबरी केली होती.

सगळेच शिक्षक या वर्गापुढे अगतिक होते. पण भूगोलाच्या शिक्षकांना अतिशय संताप आला या सर्वच पोरट्यांचा. एकतर ते नवीनच आले होते. त्यामुळे त्यांना खूप उत्साह होता शिकविण्याचा. प्रत्येक धडा शिकवून संपला की एक दिवसांनी ते त्या धड्यावरची १० मिनिटांची चाचणी घेत. त्यामुळे प्रत्येक मुलाला सतत अभ्यास करावाच लागेल असं त्यांना वाटत होतं. इतकं करूनही कितीतरी मुलं भूगोलात नापास झाली होती. सगळ्यात खालचा हायेस्ट बाळू होता. भोपळ्याएवढं शून्य होतं त्याला. भूगोलाच्या शिक्षकांचा नुसता संताप संताप झाला होता. मुलांना किती बोलू आणि किती नको असं त्यांना झालं होतं. विशेषत: बाळूला ' बाळ्या, अरे त्या शिवाजीला नावं ठेंवता. जरा अक्कल शिका त्याच्याकडून. अरे, एकदा तरी भूगोलात पास होईन, असं कधीच का वाटत नाही तुला ? का ' सर कसे पास करतात ते पाहू.' अशी पैज मारली आहेस तू ? शरम वाटते तुम्हा मुलांची मला. इतकं जीव तोडून शिकवितो मी, अरे दगडाला सुद्धा समजेल पण तुम्हाला समजणार नाही. दगड झाला असतात तर निदान उपयोग तरी झाला असता शाळेला. पायऱ्या बांधायला. बरं का बाळ्या.'

कधी नव्हे ते बाळूला शिक्षकांचं बोलणं लागून राहिलं. कदाचित सगळ्यात कमी मार्क मिळाल्यामुळे असेल. शाळा सुटली. बाळू हळू हळू घरी निघाला. सगळी पोरं केव्हा पसार

झाली इकडे त्याचं लक्षच नव्हतं. लक्ष गेलं तेव्हा त्याला दिसलं, त्याच्या पुढेच शिवाजी चालला आहे. त्यानं शिवाजीला हाक मारली आणि त्याचा भूगोलाचा पेपर बघायला मागितला. पेपराची पानं तो उलटत होता. सगळीकडे एकसारखं वळणदार अक्षर होते. कुठे खाडाखोड नव्हती. बाळू पेपर वाचू लागला. पण त्याला काहीच कळेना त्यातलं. मुळात बाळूला विषयच समजलेला नव्हता. मग उत्तरं वाचून काय उपयोग? बाळूनं विचारलं, "काय रे शिवाजी, कसं काय जमतं तुला इतकं सगळं लिहायला?' अरे, त्यात अवघड काही नाही. सोपं आहे अगदी. शिवाय मी की वर्डस लक्षात ठेवतो. त्यामुळे प्रश्नाचं सगळ्याच्या सगळं उत्तर मला बरोबर देता येतं.' शिवाजीनं सांगितलं. 'ए, मला शिकवशील काय रे तुझी पद्धत?' बाळूच्या तोंडून अभावितपणे प्रश्न निघून गेला. वास्तविक शिवाजीला त्रास देण्यात बाळूचाच जास्त पुढाकार होता. आज प्रथमच बाळू शिवाजीशी धडपणे बोलला. पण शिवाजीनी मनात काहीही न ठेवता बाळूला उत्तरं दिली होती. इतकच काय, आपली स्वत:ची अभ्यासाची पद्धत बाळूला शिकविण्याची त्यानं तयारी दाखविली. शिवाजी खरोखरीच चांगला मुलगा आहे हे बाळूला पटलं. 'शिवाजी, माझ्यामुळें तुला अभ्यासात अडथळा तर होणार नाही?' बाळूनं विचारलं. 'अजिबात नाही. तुला माहीत आहे, जगात एकच अशी गोष्ट आहे, जी दिल्यानं वाढते.' शिवाजी म्हणाला. पण बाळूचं ज्ञान इतकं अगाध असतं तर त्याला भूगोलात भोपळा का मिळाला असता. 'अरे ज्ञान, ज्ञान हे दुसऱ्याला दिल्यानं नेहमी वाढतं. मी तुला भूगोलाचा अभ्यास सांगेन तेव्हा माझा भूगोलाचा अभ्यास अधिक पक्का होईल. हो की नाही?' शिवाजीनं विचारलं. यावर

वाळूनं नंदीबैलासारखी मान हलवली.

संध्याकाळी बाळू शिवाजीकडे गेला. शिवाजीनं सुरुवात केली. 'हे बघ बाळू, भूगोलात प्रथम, तो देश विषुववृत्तापासून किती अंतरावर आहे हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. म्हणजे तिथली हवा उष्ण की थंड हे आपल्याला कळतं. नंतर समुद्र. समुद्र जवळ असेल, तर पाऊस जास्त. कोकणात पहा- हवा उष्ण. समुद्र जवळ म्हणून पाऊस जास्त, म्हणून पीक तांदुळाचं, नारळी पोफळी. आता अशा प्रकारचं हवामान जिथं जिथं असेल तिथं तिथे हेच पीक असतं. बांगला देशात, ब्रह्मदेशात. समुद्र खूप दूर असेल तिथं हवा उष्ण, पाऊस कमी. वाळवंटी प्रदेश असण्याची शक्यता. डोंगर असेल तर पाऊस जास्त पडतो. नद्या असतील तर सुपीक जमीन तयार होते. सर्वसाधारण या गोष्टी लक्षात ठेवल्या तर त्या त्या देशाचं हवामान, पिकं आपल्याला कळतात. पिकांवरून उद्योगधंद्याचा अंदाज येतो. महाराष्ट्रात ऊस पिकतो म्हणून तिथे साखरेचे कारखाने आहेत. यावरूनच आपल्याला आयात निर्यातही लक्षात येते. जे आपल्याकडे जास्त आहे ते आपण निर्यात करतो, जे नाही ते आयात करतो. ब्रम्हदेशात डोंगरावर दाट जंगलं आहेत. म्हणून तिथं लाकडाचं उत्पादन होतं. लाकूड बाहेरदेशी पाठवलं जातं. हवामानावरून, पिकांवरून त्या त्या प्रदेशातील लोकांचे कपडे, अन्न हे पण आपल्या लक्षात येते. समुद्र आहे तिथे मासे आहेत, डोंगर आहे तिथे लाकूड आहे. औषधी वनस्पती आहे. काय आहे का सोपं?' शिवाजीनं विचारलं. 'तू सांगताना तरी तसं वाटलं. पण लक्षात काही राहीलं नाही? बाळू म्हणाला. 'ठीक आहे. मी पुन्हा एकदा सांगीन आणि हे बघ, ब्रम्हदेश आपण प्रथम करू. त्याची चाचणी सर घेणार आहेत

ना ?' शिवाजीची ही सूचना बाळूला पटली. दुसऱ्या दिवशी ब्रम्हदेशाचा अभ्यास करायचा ठरवून बाळू निघून गेला.

दुसऱ्या दिवशी ब्रम्हदेश शिवाजीनं बाळूला समजावून सांगितला. 'खरंच शिवाजी, वाटलं होतं तेवढं काही अवघड नाही. तू वर्गातल्या सगळ्यांनाच सांग ना तुझी अभ्यासाची पद्धत. बघ तर चाचणीत सगळी मुलं पास होतील. आपण सरांना आश्चर्यचकीत करू या.' बाळू म्हणाला. 'माझी काहीच हरकत नाही. पण, पण तुला माहीत आहे. मी कुणालाच आवडत नाही. माझं कोण ऐकून घेणार ?' शिवाजीला वाईट वाटत होते. वर्गात त्याला कुणीच मित्र नव्हता. 'हे बघ शिवाजी, ते माझ्याकडे लागलं. खरं तर मीच वाईट आहे फार. मीच तुला त्रास दिला तरी पण मनात न ठेवता, तू मला शिकवलंस. शिवाजी मला फार वाईट वाटतं. मी तुला त्रास दिला.' बाळू म्हणाला.

दुसरा दिवस नेहमीप्रमाणेच उजाडला आणि नेहमीप्रमाणेच शाळा सुरू झाली. मधल्या सुट्टीची घंटा वाजली. शिक्षक निघून गेले. आणि कोपऱ्यातून आवाज आला, 'कोण तो, कोण तो, कोण रे तो ?' मुलांना वाटलं आपली नेहमीची गंमत सुरू झाली. त्यामुळे 'कोण तो, कोण तो' पुढे पुढे सरकू लागलं. शिवाजीपर्यंत 'कोण तो' पोचल्याबरोबर, तो पटकन पुढे झाला. आपल्या हातातील नकाशाची सुळकांडी फळ्यावर उलगडीत तो म्हणाला, 'मी आहे ब्रम्हदेश.' मुलं चकीतच झाली. आजपर्यंत मुक्याचं व्रत घेतलेला हाच का तो शिवाजी. सगळेच त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागले. शिवाजी सांगू लागला, 'उद्या आपली ब्रम्हदेशाची चाचणी आहे. अभ्यास लक्षात कसा ठेवायचा याची सोपी युक्ती मी सांगतो. की वर्ड्स म्हणजे नेमके शब्द. फक्त शब्द लक्षात ठेवले

की संपलं. कुलुपाला जशी नेमकीच किल्ली लागते, तरच ते उघडतं, तसंच अभ्यासाचं पण आहे. ब्रम्हदेशासाठी फक्त काही शब्द लक्षात ठेवायचे. प्रथम अर्थातच ब्रम्हदेश, कर्कवृत्त, म्हणून हवा उष्ण, समुद्र किनारा म्हणून पुष्कळ पाऊस, म्हणून भात, मासे, म्हणून तांदूळ सडण्याच्या गिरण्या. मच्छीमारीचा धंदा, डोंगरांच्या रांगा म्हणून खूप पाऊस, म्हणून जंगले. म्हणून इमारती लाकूड, लाकूड कापण्याच्या गिरण्या, लाकडाची निर्यात, पठारी प्रदेश म्हणून पाऊस कमी, परतु नद्या म्हणून तांदूळ, मका, बाजरी, भुईमूग, कापूस. मुख्य धंदा उघडच आहे. शेती, लाकूडतोड, आता पहा, आणखी कमी शब्द लक्षात ठेवले तरी पुरतील. ब्रम्हदेश, कर्कवृत्त, समुद्रकिनारा, डोंगराळ प्रदेश, पठारी प्रदेश, नद्या. एकेका शब्दावरून तिथलं हवामान, जमीन हे आपल्या लक्षात येतं. त्यावरून पिकं कळतात. मग त्यावरून उद्योगधंदे, निर्यात या गोष्टी लक्षात येतात. या मी आत्ता सांगितल्या ना गोष्टी, या सर्व साधारणपणे सगळीकडे लागू पडतात. इतक्या जरी लक्षात ठेवल्या तरी आपण पास होऊ शकतो. भूगोलात लक्षात ठेवावी लागतात ती मुख्य शहरांची, नद्यांची, डोंगरांची नावे आणि काही वैशिष्ठ्यं असतील त्या देशाची तर ती '. खरंच शिवाजी सांगत होता ते किती सोपं वाटत होतं. काहीतरी नवीन माहिती कळल्यासारखी वाटत होती. शिवाजी स्वतःच विद्यार्थी असल्यामुळे, त्याची पद्धत मुलांना जवळची वाटत होती आणि मुख्य म्हणजे, चक्कपैकी सगळी मुलं लक्ष देऊन ऐकत होती. 'तुम्ही पुन्हा एकदा घरी सगळं वाचून काढा ' शिवाजीनं सांगितलं.

दुसरा दिवस उजाडला. आज सातवी क चा वर्ग शांत शांत होता. जो तो भूगोलाच्या चाचणीचा अभ्यास करीत होता. या

चाचणीत आपण सगळ्यांनी पास होऊन दाखवायचं असं बाळूनं सांगितलं होतं. प्रत्येकाला ते पटलंही होतं. मधल्या सुट्टीतही कुणी बाहेर गेलं नाही. पुन्हा एकदा ' कोण तो ' आणि ' मी आहे ब्रम्हदेश ' ची रंगीत तालीम झाली. मधली सुट्टी संपल्याची घंटा झाली. भूगोलाचे शिक्षक वर्गात आले. त्यांनी झरझर फळ्यावर तीन प्रश्न लिहिले. १० मिनिटांची चाचणी सुरू झाली. चाचणी संपली की लगेच, शिक्षक पेपर तपासून चुका समजावून देत असत. आज त्यांना नेहमीचा उत्साह नव्हता. नुकत्याच झालेल्या परीक्षेत मुलांनी गाजविलेला पराक्रम त्यांच्या डोळ्यासमोर होता. आपण पराभूत झालो आहोत या भावनेनं त्यांना या वर्गात रस उरला नव्हता. १० मिनिटं संपली, सगळ्यांनी आपापले कागद शिक्षकांकडे दिले, सगळी मुलं अगदी शांत बसली. शिक्षकांना जाणवलं, आज काहीतरी वेगळं आहे. नेहमी आरडाओरडा करून वर्ग डोक्यावर घेणारी ही मुलं. मुलांना उत्सुकता होती. आपण पास होतो की नापास. म्हणूनच सगळी अधीरपणानं शिक्षकांकडे पहात बसली होती.

शिक्षकांनी एक पेपर तपासला. चक्क पास होता तो मुलगा. त्यांनी दृष्टी वर उचलून एकदा वर्गाकडे पाहिलं. दुसरा पेपर तपासला. दुसराही मुलगा पास. तिसरा, चौथा, पाचवाही पास. शिक्षकांच्या ओठावर किंचित हसू उमटलं. बाळूचा पेपर शिक्षकांनी तपासला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे बाळूला खूपच चांगले मार्क्स पडले होते. कारण इतरांपेक्षा त्याचा जास्त अभ्यास झाला होता. सगळीच्या सगळी मुले पास. शिक्षकांना सुखद धक्का बसला.

आणि मग त्यांना सगळी हकीगत कळली. शिवाजीनं खरोखर पराक्रम केला होता. तो स्वतः विद्यार्थी होता, त्यामुळे त्यानं

सांगितलेलं मुलांना जास्त लवकर समजलं होतं. शिक्षक सांगत होते, 'शिवाजीला खूप चांगले मार्क्स मिळालेत. आता त्याला अ तुकडीत घालायचं नक्की झालंय.' 'नको सर, शिवाजीला आमच्यातच राहू द्या. तो आम्हाला अभ्यासात मदत करील.' सगळीच मुलं म्हणून लागली. 'अरे पण, शिवाजीचं नाही का नुकसान होणार. ?' शिक्षकांनी विचारलं. 'नाही सर. अजिबात नाही, जे शिक्षक अ तुकडीला शिकवतात, तेच आम्हालाही शिकवतात. ह्या माझ्या मित्रांच्यातच मला राहू द्या' शिवाजी म्हणाला. कधी नव्हे ती वर्गातल्या मुलांची मिळालेली मैत्री, शिवाजी भारावून गेला. सगळ्या मुलांना आपण अभ्यासात मदत करायची असा त्यानं निश्चय केला.

# नाटक

सकाळी सकाळी दिग्विजयला जाग आली आणि त्याच्या पोटात धस्स झालं. आज गणिताचे पेपर मिळणार. मार्क किती मिळणार ? गुरुजी काय काय बोलणार, याची त्याला कल्पना होतीच. पण प्रत्यक्षातला प्रसंग कसा काय घडणार याची त्याला भीती वाटत होती.

तसा दिग्विजय हुशार मुलगा म्हणूनच ओळखला जायचा. नेहमी दहाच्या आत नंबर. शिवाय निरनिराळ्या खेळांत त्याचा पाय नेहमी पुढेच असायचा. गॅदरिंगमध्ये तो दरवर्षी भाग घ्यायचा. विशेषत: त्याच्या नकला मुलांना खूपच आवडायच्या. सगळ्यां-च्यात तो सहजपणे मिसळत असे. त्यामुळे त्याला कितीतरी मित्र होते. हे सगळं मागच्या वर्षापर्यन्त असं होतं. पुढच्या वर्षी होत्याचं नव्हतं होईल अशी दिग्विजयलाच काय कुणालाच कल्पना नव्हती.

आठवीचे गणिताचे गुरुजी अत्यंत खाष्ट आहेत. ते मुलांना हवं तसं बोलतात, वाटेल ती शिक्षा करतात इ. इ. दिग्विजय ऐकून होता. पण त्याला त्याचं काहीच वाटलं नव्हतं. कारण तो

स्वत: हुशार होता. आणि विशेप म्हणजे गणित हा त्याचा आवडता विषय होता.

पण प्रथमग्रासे मक्षिकापात: अशी दिग्विजयची अवस्था झाली. आठवीतला गणिताचा पहिलाच तास होता. इतर विषयांच्या गुरुजींनी मुलांशी ओळखपाळख करून घेण्यात तास संपविले होते. पण या गणिताच्या गंभीर गुरुजींनी आल्याबरोबर अभ्यासाला सुरुवात केली. त्यांनी एकाही मुलाला नाव विचारले नाही. कुणाशी गोड बोलले नाहीत. मग गंमतीजमती सांगण्याचं तर नावच नको. काय झालं कोण जाणे, दिग्विजयचे अेक गणित चुकले. नेमका गुरुजींना तोच सापडला. "दिग्या गाढवा, ' अशी गर्जना ऐकून दिग्विजयची बोबडीच वळली. हातापायाला कापरे सुटले. डोळ्यांत पाणी जमा झाले. कुणाकडून कधी असा अपमान करून घेण्याची त्याच्यावर वेळच आली नव्हती. शाळेत नाही आणि घरी पण नाही. आणि आज अचानक भर वर्गात, गुरुजी त्याला टाकून बोलत होते. दिग्विजयचं त्यांनी दिग्या करून टाकलं. दिग्या म्हटलं की, डोळयासमोर दिगंबर हेच नाव येतं. दिग्विजयला आपण खरोखरीच सगळ्या वर्गासमोर दिगंबर झालोत असं वाटायला लागलं. गुरुजींनी त्याला अेका लहानशा चुकीसाठी किती आणि काय काय बोलून घेतलं. इथंच सगळं संपलं मात्र नाही. गुरुजींना दिग्विजय म्हणजे बरा आपला बळीचा बकरा सापडला होता. रोजच्या रोज अेक दिवसही न चुकता, गुरुजी त्याला " दिग्या, गाढवा " या नावानं हाक मारीत आणि कुठल्याही कारणानं त्याला बोलून घेत. दिग्विजय या गुरुजींना इतका घाबरत असे की, गणितातले एक अक्षरही त्याला कळत नसे. गणित सोडवायला सांगितले की, गणित मांडण्यापलीकडे त्याची

काहीच प्रगती होत नसे. मग आहेच ' पुन्हा दिग्या गाढवा. '

गणिताच्या या तासामुळे त्याचा सगळा दिवस वाईट जायचा. उठल्याबरोबर त्याला याच तासाची आठवण होई. गणिताच्या तासापर्यन्त जरा तरी वेळ बरा जायचा. पण गणिताच्या तासाची घंटा वाजली की, त्याची छाती धपधप करायला लागायची. मग तासात अनेकदा त्याची चंपी होत असे. उरलेले तास तो कसेबसे घालवी. शाळा सुटली की हिरमुसल्या चेहऱ्यानं तो परत येई. अलीकडे घरी तो आईला शाळेतल्या गमती सांगत नव्हता. मित्रांशी खेळायला जात नव्हता. घरी त्याचा चेहरा नेहमी गंभीरच असायचा. आलं की खाऊन तो लगेच दप्तर घेऊन बसायचा. खरं तर आईपासून आपला चेहरा लपविण्यासाठी त्याचं हे नाटक होत. अभ्यासाचा पसारा मांडून तो नुसता बसून रहायचा. काय करावं आणि कसं करावं त्याला कळतच नव्हतं. रोजच्या रोज होणारा अपमान तो कुणाला सांगू शकत नव्हता. वास्तविक कुणापाशी तरी बोलल्यामुळे, त्याचं मन हलकं झालं असत. काहीतरी मार्ग काढता आला असता. पण रोजचा हा अपमान त्याच्या इतका जिव्हारी लागत होता की, कोणाजवळ तरी तो बोलून टाकण्याची त्याला कल्पनासुद्धा सुचली नाही. काय तर म्हणे, ' दिग्या, तू शुद्ध दगड आहेस दगड. अरे, खराखरा दगड झाला असतास तर पायरीला तरी तुझा उपयोग झाला असता.' म्हणे ' दिग्या, त नर्मदेतला गोटा आहेस. गुळगुळीत कशाचाही तुझ्यावर परिणाम होत नाही. मी एवढं रोज बोलतोय. पण तुझ्यात काडी इतकी सुधारणा नाही. ' म्हणे ' कशाला शाळेत येता ? बापाला काय जास्त पैसे झालेत वाया घालवायला ?' इ. इ. गुरुजींची ही मुक्ताफळं.

आणि आज तर गणिताचा पेपर मिळणार, दिग्विजयला काहीच सुचत नव्हतं. कुठे लक्ष लागत नव्हतं. आईनं त्याच्यातला बदल ओळखला होता. तिनं कितीदा विचारलं, ' काय झालं ? ' पण तो मुळी बोलायलाच तयार नव्हता. धड लहान नाही, धड मोठा नाही अशा अर्धवट वयात दिग्विजय आला होता. त्यामुळेच की काय आईला सुद्धा आपला कमीपणा सांगण्याची त्याला लाज वाटत होती. कदाचित वडिलांना तो सर्व सांगू शकला असता. पण आईइतका विश्वास त्याला वडिलांबद्दल नव्हता

शेवटी एकदाचा गणिताचा तास सुरु झाला. गुरुजी वर्गात आले. पेपर वाटायला त्यांनी सुरुवात केली. दिग्विजयचा नंबर आला. गुरुजी म्हणाले, ' या ! या ! मोठा दिग्विजय गाजवलात. मास्तरांचं नाक कुणीतरी कापलंच पाहिजे नाही का? या या, घ्या आपला पेपर. ' दिग्विजय कसाबसा उभा राहिला. आणि पाय ढकलीत तो टेबलाकडे जाऊ लागला. गुरुजी कडाडले, ' इतकं हळू चालायला काय झालंय ? गर्भार म्हशीसारखं ?' बापरे, त्यांचे उद्गार ऐकून सगळ्या वर्गात हसण्याची लाटच उठली. अर्थात हळू. दिग्विजयला तर मेल्याहून मेल्यासारखं झालं, तो टेबलापाशी पोचला. गुरुजींनी त्याचे मार्क सगळ्या वर्गाला दाखवले. शंभर-पैकी शून्य. वर्गातला हायेस्ट–शेवटून. ते काय काय बोलले हे दिग्विजयला धड आठवतही नव्हते इतकं त्याचं मन बधीर झालं होतं.

बाकीचे तास कसे गेले तेही कळले नाही. शाळा सुटली. तो घरी निघाला. आता घरी कसं तोंड दाखवायचं ? आई समजून घेईल. पण बाबा ? त्यांची त्याला खात्री वाटत नव्हती. बाबा लाड करायचे. म्हणेल ते आणून द्यायचे. पण भलत्या बाबतीत

लाड नाहीत. दिग्विजय घरी पोचला तो याच मनःस्थितीत, घरी काय होणार ? पण तो घरी पोचला तर घरी निराळीच गडबड चालली होती. आईच्या माहेरी कुणाचे तरी लग्न होते. अगदी लवकरचा मुहूर्त होता. आईला जायलाच हवे होते. तेही ताबडतोब. त्याचीच तयारी चालू होती. दिग्विजयलाही न्यायचे ठरले होते. नाहीतरी परीक्षा नुकतीच संपली होती. चार–आठ दिवस शाळा बुडली म्हणून फारसे बिघडत नव्हते. दिग्विजयसारखा हुशार मुलगा बुडलेला अभ्यास सहजपणे भरून काढील. तो काहीच बोलला नाही. गणिताचे मार्क मिळाल्याचे त्यानं सांगितलं नाही. नेहमीसारखा तो उत्साहाने तयारीला मात्र लागला नाही. आईला राहून राहून त्याची काळजी वाटत होती. असा कसा एकाएकी हा मुलगा बदलून गेला ? तिनं बाबांना सुद्धा म्हटलं, पण त्यांना काहीच वाटलं नाही. ' अगं, मोठा होतोय तो. बदलणारच. शिवाय अभ्यास नाही का वाढला ?' बाबांनी आईची समजूत घातली.

कितीतरी वर्षांनी दिग्विजय आजोळी आला होता. लगीन-घर सगळ्या नातेवाईकांनी गजबजून गेलं होतं. कुठले कुठले मामा, मावश्या, बहिणी नि भाऊ. वातावरण बदललं. त्यामुळे दिग्विजयचा मूड जरा सुधारला. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे शाळा नव्हती तो दुष्ट गणिताचा तास नव्हता. संध्याकाळी मामाशी भेट झाली. मुलखाचा गमत्या होता मामा. त्यानं दिग्विजयची विचारपूस केली. कोणत्या शाळेत शिकतो ते विचारलं. शाळेचं त्यानं नाव सांगताच मामा म्हणाला.

' मग तुम्हाला गंभीर नावाचे मास्तर आहेत की नाहीत ?'

' आहेत ना, ' दिग्विजयनं सांगितलं. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव कोमेजून गेले त्यांच्या आठवणीसरशी. मामानं बरोबर हेरलं.

'काय रे, खूप रागावतात का रे, चांगली शिक्षाबिक्षा करतात की नाही ?' मामानं विचारलं.

'तुला माहीत आहे दिग्विजय, अरे मी आणि तुझे ते गंभीर मास्तर एकाच वर्गात होतो. कसला भित्रट होता दिग्या.' मामा म्हणाला. दिग्विजय एकदम दचकला. 'दिग्या ?' तो म्हणाला 'हो रे बाबा, दिग्याच' मामा सांगू लागला.

'अरे गंभीरचं नाव दिगंबर आहे. आमचे करकरे गुरुजी, कराकरा दात खात रोज त्याला ओरडायचे, 'दिग्या गाढवा.'

'दिग्या गाढवा' 'काय सांगतोस काय मामा ?' दिग्विजय चित्कारला. 'मग काय खोटं सांगतोय ?' मामा पुढे सांगू लागला, 'बरं का दिग्विजय, अरे हा दिगंबर फारच भित्रट म्हणून मास्तर त्याला खूप बोलायचे. एका परीक्षेची गंमत सांगतो तुला. परीक्षा झाली आणि पेपर वाटायला आणले होते मास्तरांनी. दिगंबरची पाळी आली. तो बिचारा आधीच थरथर कापत होता. मास्तरांनी ओरडून त्याला हाक मारली. बिचारा कापत कापत त्यांच्या टेब-लाकडे जाऊ लागला. त्याबरोबर करकरे मास्तर काय म्हणाले माहीत आहे, 'काय रे, हळूहळू काय चालतोस गर्भार म्हशी-सारखा ?' दिगंबरचं आडनाव गंभीर आहे ना, त्यावर त्यांचा विनोद.' दिग्विजयला खूप हसू आलं. 'असं म्हणाले का ? कमाल आहे.' दिग्विजयच्या मनावरचं ओझं खूप कमी झालं होतं.

'अगदी अस्संच आम्हालासुद्धा बोलतात ते, अगदी गर्भार म्हशीसारखं' असं म्हणून तो पुन्हा हसू लागला. 'मग तुला बोल-तात की नाही रे ?' मामानं विचारलं. 'न बोलायला काय झालं? मी वर्गातलाच एक मुलगा आहे ना ?'

दिग्विजयनं सांगून टाकलं. मनातलं शल्य बोलून टाकल्या-

मुळे त्याला अगदी हलकं वाटत होतं. 'आणि मामा, तुला नाही का रे करकरे गुरुजी रागवायचे ?' त्यानं विचारलं.

'चिक्कार, पण हा पठ्ठ्या काही भित्रट नव्हता. एकदा मला काय म्हणाले होते माहीतेय. शंखोबा, दगड आहेस अगदी दगड. खराखरा दगड झाला असता तर पायरीला तरी उपयोग झाला असता.' दिग्विजयला पुन्हा हसू आलं. मामा अगदी नकल्या. तो करकरे मास्तरासारखा आवाज काढून नक्कल करून दाखवत होता. करकरे मास्तरांना एकदा भेटून यायची इच्छा झाली. पण बिचारे बारातेरा वर्षांपूर्वी वारल्याचं मामानं सांगितलं. मामाशी मनमोकळ्या गप्पा झाल्यानं दिग्विजय पुन्हा पूर्वीसारखा झाला. अगदी सातवीतल्यासारखा. तो पुन्हा सगळ्यांच्यात मिसळू लागला. दुसऱ्या दिवशी क्रिकेट खेळायचं असंही त्यानं आपल्या भावंडांना सांगितलं. कितीतरी दिवसांनी तो आईजवळ गेला आणि तिच्याशी लाडेलाडे बोलला. आईला खूप बरे वाटले. चार दिवस बदल झाला की दिग्विजयला बरं वाटेल असं तिला वाटतंच होतं.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे दिग्विजयला लवकर जाग आली. अजून बरोबरीची मंडळी ढाराढूर झोपली होती. इकडे तिकडे वेळ घालवला त्यानं. मग तो नुसताच बसून राहिला. जवळच त्याला कुठलं तरी फाटकं-तुटकं मासिक सापडलं. तो पानं उलटू लागला. आणि त्याला एक आश्चर्यकारक बातमी दिसली विहारमधल्या कुठल्यातरी एका मुलाची त्याच्या पूर्व-जन्मीची आठवण जागृत झाली होती. पूर्वजन्मीचं त्याचं घर, बायको, मुलं याचा त्याने बरोबर पत्ता सांगितला. पूर्वजन्मी त्याचा खून झाला होता. तो कुणी केला होता आणि कोणत्या पद्धतीनं हेही त्यानं सांगितलं होतं. तपास करता त्यानं सांगितलेली

सगळी माहिती खरी ठरली होती. वाचून झाल्यावर याच गोष्टीचा उलटसुलट विचार दिग्विजयच्या मनात येत होता. विचार करता-करता त्याला एकमस्त कल्पना सुचली. तो धावत पळत मामाकडे गेला. मामा अजून झोपलाच होता. दिग्विजयनं घसा साफ केला. कालचं मामाचं बोलणं पुन्हा एकवार मनाशी बोलून पाहिलं आणि मग करकरे मास्तराच्या आवाजात तो मामाच्या कानाशी मोठ्यांदा बोलू लागला, 'शंखोबा, दगड आहेस दगड, अरे खराखुरा दगड झाला असतास तर निदान पायरीला तरी उपयोग झाला असता.' मामा अगदी खडबडून जागा झाला. दिग्विजयला पाहून तो हसतच म्हणाला, 'कारे बाबा, पुन्हा त्या काटेरी आयुष्याची आठवण करून देतोस ?' 'पण मामा, नक्कल कशी काय जमली ?' दिग्विजयनं विचारलं. 'अगदी एवन, बाबारे, पुन्हा त्या दिवसांची आठवण करून दिलीस. देऊ का एक धपाटा ?' मामा म्हणाला. 'नाही रे, आपली रिहर्सल करून पाहात होतो.' दिग्विजयनं सांगितलं. 'कसली रे बाबा रिहर्सल ? आणि माझ्यावर कशा-साठी त्याचा प्रयोग ?' मामानं विचारलं. मग दिग्विजयनं त्याच्या मनात आलेली कल्पना मामाला सांगितली. गंभीर मास्तरांची वाईट बोलण्याची सवय घालवायला बहुतेक ही कल्पना उपयोगी पडेल असं मामालाही वाटलं, मग दोघांनी मिळून काय काय कसं कसं करायचं, बोलायचं हे ठरवलं. मामान करकरे मास्तरांची जास्तीत जास्त माहिती दिग्विजयला दिली. दिग्विजयची त्यान बोलण्याची प्रॅक्टीस करून घेतली.

लग्नसमारंभ निर्विघ्नपणें पार पाडून दिग्विजय आणि आई परत आले. दिग्विजयनं मित्राकडे जाऊन बुडलेल्या अभ्यासाची चौकशी केली उद्या इन्स्पेक्शन असल्याचं त्याला कळलं. आपण

ठरवलेल्या बेताचं काय करावं असं त्याला प्रश्न पडला. पण मामाचा आदर्श त्यानं डोळ्यासमोर ठेवला. काही झालं तरी घाबरायचं नाही हा मामाचा कानमंत्र त्यानं आठवला आणि काही झालं तरी बेत असाच पार पाडायचा असा त्यानं निश्चय केला.

दुसरा दिवस उजाडला, दिग्विजय मनातल्या मनात गंभीर गुरुजींच्या तासाला करायच्या नाटकाची तालीम करीत होता आणि काही झालं तरी घाबरायचं नाही हे मनाशी घोकत होता. नेहमीच्या वेळी शाळा सुरू झाली. आधीचे तास संपले. अजून इन्स्पेक्शनला कोणी वर्गात आले नव्हते. गंभीर गुरुजींच्या तासाची घंटा झाली आणि मग गुरुजी आणि इन्स्पेक्टर बरोबरच वर्गात आले. इन्स्पेक्टर खुर्चीवर बसले आणि गंभीर गुरुजी शिकवू लागले. मधेच त्यांनी काहीतरी प्रश्न विचारला. काही हात वर झाले. इन्स्पेक्टरच मुलांना प्रश्न विचारू लागले, हात वर न केलेल्या मुलांना. त्यांनी दिग्विजयला प्रश्न विचारला. तो उभा राहिला. प्रश्नाचं उत्तर तो देणारच नव्हता. पण खरं तर त्याचं वर्गात काय चाललंय याच्याकडे लक्षच नव्हतं. आपण करायच्या नाटकानं त्याचा पूर्ण कब्जा घेतला होता. संधी केव्हा मिळतेय याची तो वाट पहात होता आणि मनाला धीर धरायला सांगत होता.

अचानक इन्स्पेक्टरांनी त्याला प्रश्न विचारला. हाच तो क्षण. तो क्षण पकडला पाहिजे. या जिद्दीनं त्यानं पाठ केलेल्या भाषणाला सुरुवात केली. क्षणभर तो बावचळला होता. त्यामुळे पहिले काही शब्द जरा वेगळ्या आवाजात आले. पण त्यामुळेच ते जास्त प्रभावी झाले. करकरे मास्तरांच्या आवाजात तो बोलू

लागला. ' दिग्या गाढवा, इकडे ये. काय रे, हळूहळू चालतोस गर्भार म्हशीसारखा ? बघा बघा, किती मार्क मिळवलेत ते ? शंभरपैकी शून्य ?' असं म्हणून दिग्विजयनं आपली वही वर करून सर्व वर्गाला दाखविली. त्याच्या या बोलण्याचा मुलांना अर्थ कळला नाही. कारण हे सगळे शब्द गंभीर गुरुजींचे होते. पण गुरुजींना मात्र बरोबर स्मरण झालं. साक्षात करकरे मास्तर आपल्याला बोलताहेत असं त्यांना वाटलं. ' दिग्या गाढवा, दगड झाला असतास तर पायरीला तरी उपयोग झाला असता.' दिग्विजय पुढे बोलू लागला. काय चाललंय हे न समजल्यामुळे इतका वेळ इन्स्पेक्टर गप्प होते. शेवटी हे गौडबंगाल न समजून त्यांनी दिग्विजयला थांबवले. ' काय रे, तुला उत्तर विचारले तर तू काय बडबडत बसलाहेस ?' ' मला अरेतुरे करून बोलता ? तुम्ही कालची पोरं ? माझं वय माहीत आहे ? ऐंशी वर्षाचं वय आहे माझं ' दिग्विजयनं प्रसंगावधान राखून उत्तर दिलं. काही-तरी वेगळंच प्रकरण आहे हे सगळ्यांच्याच लक्षात आलं. 'करकरे मास्तर म्हणतात मला. तुम्हाला माहीत नसेल. आणि हा दिग्या माझा विद्यार्थी. एकदम ढ.' दिग्विजय बोलत होता. गंभीर गुरुजींची चांगलीच घाबरगुंडी उडाली. त्यांनी दोन मुलांना खूण करून दिग्विजयला बाहेर न्यायला सांगितले. दिग्विजयनं सरळ घर गाठले. नाटक तर पार पडले. आता पुढे काय होणार याची त्याला भीती वाटत होती. पण मामाचं स्मरण करून तो त्या भीतीला सारखा झटकून टाकत होता.

दुसरा दिवस उजाडला. शाळेत तर जायलाच हवे होते. आता कालच्या नाटकाचं काय होणार याची दिग्विजयला भीती वाटू लागली. शाळा सुरू झाली. होता होता गंभीर गुरुजींच्या

तासाची घंटा वाजली. दिग्विजयबरोबर सगळीच मुलं पुढल्या प्रसंगाच्या कल्पनेनं गप्प बसली. गंभीर गुरुजी वर्गात आले. काही एक न बोलता ते शिकवू लागले. दिग्विजयकडे न बघता. त्याची दखल न घेता त्यांनी तास संपवला.

दिग्विजयचा आनंद ओसंडत होता. त्याचे नाटक कमालीचे यशस्वी झाले होते.

वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. १५८४ दिनांक 3।५।८५
विषय बा वा क्र. ........

# खरी संपत्ती

आत्ता आतापर्यंत राघू म्हणजे एक सुखी प्राणी होता. झोपडपट्टीतल्या संसारात समाधानी होता. सकाळी सकाळीच भाकरी बांधून तो आणि त्याची बायको दगडाच्या खाणीत दगड फोडायला जायचे. त्याची बारकी तीनचार मुलं दिवसभर डुकरांच्या बरोबरीनं मातीत खेळायची. एक मात्र होतं. राघूला इतरांप्रमाणे कसलंही व्यसन नव्हतं. नाहीतर इतर झोपड्यांतले पुरुष रोज रात्री दारू पिऊन तर्रर्र होऊन येत आणि बायकोला यथेच्छ बडवून काढीत. असल्या काही भानगडी राघूकडे नव्हत्या. प्रामाणिकपणे कष्ट करायचे आणि मिळेल ती ओलीसुकी भाकरी खायची. बस् !

पण या वर्षभरात त्याचं सुखस्वास्थ्य पार नाहीसं झालं होतं. त्याला कारणं होती. त्याच्या झोपडपट्टीसमोरच तयार झालेली बंगल्यांची रांग. छोटे छोटे सुबक बंगले. एका ओळीत कसे छान दिसत होते. त्यात रहाणारी ती गोरीगोमटी, स्वच्छ आणि ऐटदार

मुलं. रोज शाळेचा कडक इस्त्रीचा ड्रेस घालून, टॉक टॉक बूट वाजवीत शाळेच्या बसमधून जाणारी मुलं. सोन्याचं मंगळसूत्र, बांगड्या घालून टापटिपीत रहाणाऱ्या बंगल्यातल्या बायका आणि स्कूटर, मोटार सायकलवरून कामाला जाणारी ती चटपटीत पुरुषमंडळी ! राघूला वाटत होतं आपणच काय पाप केलं म्हणून आपल्या नशीबी हे असलं जिणं आलं ? सकाळी उठून तो दात घासायला बाहेर आला की त्याच्या मनात हेच विचार रोज रोज येत. रोज तो म्हणे, ‘ परमेश्वरा, प्रामाणिकपणानं मी कष्ट करतो तरी असलं रे कसलं आयुष्य माझ्या वाट्याला दिलंस ? दिलंस तर दिलंस वर माझं आयुष्य वाईट हे कळण्याची बुद्धीसुद्धा दिलीस. इतर माझे शेजारी कसे सुखी आहेत. आपल्याला पुष्कळ गोष्टी मिळाल्या नाहीत हेच मुळी त्यांच्या लक्षात येत नाही.’ रोज रोज देवाला आळवून काय उपयोग होता ? तो थोडाच पुराण-काळातल्याप्रमाणे वर देणार होता राघूला ?

वर म्हणा की काही म्हणा, पण एक आश्चर्य घडलं खरं. राघूला पाच लाखाचं लॉटरीचं बक्षीस मिळालं. पहिल्याप्रथम त्यानं काय केलं असेल, तर समोरच्या सोसायटीतला शेवटचा बंगला विकाऊ होता. तो विकत घेऊन टाकला. मग ज्या दगडाच्या खाणीत तो काम करीत होता ती खाण विकत घेतली. एक मोटार घेतली. सगळ्या पोरांना शेजारच्या मुलांप्रमाणे इंग्रजी शाळेत अडकवलं आणि घरी एक चोवीस तासांचा मास्तर ठेवून दिला मुलांना आणि त्याला स्वत:ला शिकवायला.

झोपडपट्टीतले लोक म्हणून सुरुवाती सुरुवातीला शेजारी-पाजारी लोक राघूच्या कुटुंबाकडे ढुंकूनही पहात नसत त्याच्या पोरांना कुणी खेळायला घेत नसत. पोरांनाही पूर्वीप्रमाणे मातीत

डुकरांबरोबर, शेळ्यांबरोबर लोळायला आवडत असे. पण हळू-हळू राघूचं कुटुंब बदलू लागलं. मुलं तर खूपच लवकर बदलली. ती 'यस–नो असं' थोडं फार बोलू लागली. आईला मम्मी आणि बापाला डॅडी म्हणू लागली. स्वच्छ आणि ऐटीत राहू लागली. राघूची बायकोसुद्धा बदलली. पूर्वी दोन्ही वेळचा स्वयंपाक करून ती राघूच्या बरोबरीनं खाणीत काम करी. पण आता मात्र नुसतं घरी बसूनही तिला काम होईनासं झालं. घरी कामाला नोकर-माणसं ठेवण्यात आली.

कष्ट करीत असल्यामुळे पूर्वी राघू आणि त्याची बायको कसे सडसडीत पण घाटदार होते. आता मात्र राघूची ढेरी ऐसपैस सुटली, तर त्याची बायको म्हणजे एक गोल गरगरीत फुटबॉल बनली. वजन कमी करण्यासाठी तिला डाएटिंग करायला लागत होतं.

अशा तऱ्हेने राघूचं आयुष्य चाललं होतं. एकदा रात्रीतून त्याला एकदम जाग आली. पोट फुगल्याचं आणि छातीत विचित्र काही होत असल्याचं त्याला जाणवलं. तो खूप घाबरून गेला. मास्तरला त्याने बोलावलं आणि डॉक्टरला फोन करायला सांगितलं. थोड्याच वेळांत डॉक्टर आले. त्यांनी राघूला तपासलं आणि रात्री काय खाल्लं ते विचारलं, 'भजी.' म्हटल्यावर डॉक्टर म्हणाले, 'मिस्टर राघू, अहो जे आपल्याला पचत नाही ते खायचं कशाला? काय गॅसेस झालेत तुमच्या पोटात! तेच वर छातीत चढलेत. समजलात! यापुढे तळकट पदार्थ खाऊ नका. वातुळ पदार्थ खाऊ नका. जेवण अगदी साधं आणि कमी घ्या. फक्त भाजी, भाकरी, ताकभात.'

हल्ली चालताना आपल्याला दम लागतो हेही राघून

सांगितलं. वास्तविक वाढलेलं वजन आणि चालायची, काम करायची मोडलेली सवय हेच कारण त्यापाठीमागे होतं. पूर्वी चहा आणि भजी हेच त्याचं अनेकदा खाणं असे. पण आता त्याला भजी खायची परवानगी नव्हती. त्याला फार वाईट वाटलं. भजी हा त्याचा आवडता पदार्थ. पूर्वी त्याला अधूनमधून ती खाणं शक्य होई. आज मात्र तो हवी तेवढी भजी अगदी रोजच्या रोज खाऊ शकला असता. पण त्यालाच तर बंदी होती.

राघूची ही तऱ्हा तर बायकोची आणखीनच वेगळी. बायकोचे गुडघे धरले. तिला उठता येईना की बसता येईना. आधीच बोजड झालेलं शरीर. त्यात हे दुखणं. त्यामुळे तिच्याही खाण्यापिण्यावर, वागण्यावर बंधनं पडली.

पोरंही आई-बापासारखीच झाली. आईस्क्रीम खाल्लं म्हणून पोरगा खोकल्याने बेजार झाला, तर दुपारी शाळेतून चालत आली म्हणून पोरगी तापाने बेजार. पूर्वी दिवसभर उन्हातान्हात खेळणारी आणि वाटेल ते पचवणारी पोरं, आता अगदी नाजूक बनली, अगदी बापासारखीच. पूर्वी खाणीतले दगडसुद्धा पचवायची ताकद असलेला राघू, त्याला आता जास्त चहासुद्धा सोसवेना. एकूण काय, पूर्वी दात होते तर चणे नव्हते आता चणे आहेत तर दात नाहीत अशी राघूची अवस्था झाली.

तो पुन्हा परमेश्वराला आळवू लागला ‘परमेश्वरा, काय रे बाबा मी तुझा गुन्हा केला म्हणून असली आजारपण आमच्या मागे लागली ?’ यापेक्षा आपलं पूर्वीचंच आयुष्य सुखी होतं असं त्याला वाटू लागलं. खूप काम करावं, असेल ती भाकरी खावी आणि मेल्यासारखं गाढ झोपावं. आता खायला आहे, प्यायला

आहे. पण झोपसुद्धा नीट लागत नाही. आपणच असे दु:खी आणि बाकीचे सुखी आहेत असं राघूला वाटत होतं.

त्यानं बाजूच्या बंगल्यांचं निरीक्षण करायला सुरूवात केली तेव्हा त्याला असं आढळून आलं की कुणी रक्तदाबाने पीडलेला आहे तर कुणी मधुमेहानं त्रासलेला आहे. कुणाला वजन कमी करण्याची चिंता आहे तर कुणाला ते वाढविण्याची. कुणाची मुलं परीक्षेत नापास होतात तर कुणाची वाईट संगतीला लागलेली.

आपणच फक्त दु:खी आहोत असं राघूला वाटत होतं ते चुकीचं ठरलं. त्याला आता पटलं, आपल पूर्वीचंच आयुष्य सुखी होतं. उत्तम आरोग्य हीच सुखाची गुरुकिल्ली आहे. आरोग्य असेल तरच सगळ्या गोष्टीचा आनंद उपभोगता येणार. आरोग्याविना सगळ्या गोष्टी व्यर्थच. 'खरंच, पूर्वीचं आयुष्य आपल्याला मिळालं तर' असं राघूला वाटत होतं. पण आता कसं शक्य होतं ते ? पूर्वीच्या काळी देवाजवळ एखादा वर मागितला आणि तो चुकीचा ठरला तर तो परत करता येत होता. पण आता असं काही करणं अशक्य होतं. नवीन स्वीकारलेलं आयुष्यच राघूला यापुढे जन्मभर जगायचं होतं. पूर्वीचं सुखी आयुष्य आता इतिहासजमा झालं होतं. उरल्या होत्या फक्त त्याच्या आठवणी.

◇

# असाही चोर

शेजारच्या रमाकाकूंकडे मी गेले होते. तिथें त्यांचा आणि त्यांच्या मोलकरणीचा सुखसंवाद माझ्या कानावर आला. मोलकरीण ठसक्यात विचारत होती, 'काय हो काकू, कुठे गेला होता? मी येऊन गेले ना ?' वास्तविक काकू कामासाठी थोडा वेळ बाहेर गेल्या होत्या. आणि त्या वेळी त्या घरात नाहीत तर त्यांची मोलकरीण दिवसभरात पुन्हा त्यांच्या घरी फिरकलीसुद्धा नाही. आपण आरामात सुट्टी घेतली आणि काकूंनाच जामत होती, पण काकू काही तिच्यावर रागावल्या नाहीत. हो, उगाच कामबीम सोडून गेली तर काय करता. हे तिला चांगलं माहिती आहे. म्हणूनच ती आणि तिच्यासारखे सगळे नोकरलोक तोऱ्यात वागत असतात. या सगळ्या पार्श्वभूमीवर आमचा भिकू अगदी वेगळेपणाने उठून दिसत असतो. तो रहायला आमच्याच घरी असतो, पण काम वेळच्या-वेळी, स्वच्छ, सांगावं न लागता आणि सुबकपणानं, एखाद्या कुशल गृहिणीप्रमाणं करतो. प्रत्येक बाई मला नेहमी विचारते, 'कुठून हो मिळवलात भिकूला तुम्ही ? आम्हाला

तरी सांगा'. यावर मी फक्त हसते, पण उत्तर काही देत नाही. भिकू मला कसा मिळाला ही एक रहस्यकथा आहे. हे रहस्य मी इतरांना सांगितलं तर भिकूलाच काय, पण मलासुद्धा कुणी घरात येऊ देणार नाही.

पाच वर्षांपूर्वी आमचं दिल्लीला जाण्याचं ठरलं. मुलांना सुट्टया लागल्या. आम्हीही रजा घेतली. गाड्यांचं रिझर्व्हेशन वगैरे व्यवस्थित पार पडलं. घराचा पण व्यवस्थित बंदोबस्त केला. आमच्या बाजूला नेहमी चोऱ्या होत असत. आमचे घर जुन्या बांधणीचे होते. छप्पर खूपच उंच होते. हवा खेळण्यासाठी खूप उंचावर गोलाकार झरोका होता. बाकी बांधणी, खिडक्या-दारं भक्कम होती, शेजारीही चांगले होते. सगळ्या दारं खिडक्या व्यवस्थित बंद करून, शेजाऱ्यांना घराकडे लक्ष ठेवायला सांगून आम्ही दिल्लीला गेलो.

आमची दिल्लीची सफर खूपच छान झाली. हवाही छान होती. ठरल्याप्रमाणे आम्ही परत आलो. घराला व्यवस्थित कुलूप पाहून, अधूनमधून घराविषयी काळजी वाटत होती ती विनाकारण होती, असं आम्हाला वाटलं. चला, सफरही छान झाली आणि घरही सुरक्षित राहिलं. आम्ही अगदी समाधानाने घरात शिरलो. यांनी किल्ली काढून कुलूप उघडलं, कडी काढली आणि दार उघडायला लागले तर दार काही केल्या उघडेना. खूप जोरजोरात धक्के दिले. ही काय भुताटकी! कुलूप, कडी जेथल्या तेथे, पण दार काही उघडेना. यांच्यामागे मी, मुलं आणि मागे हमाल सामान घेऊन उभा. सगळेच अवाक् झाले. यांचा दाराला धक्के देण्याचा कार्यक्रम चालूच होता. इतक्यात हलक्या आवाजात बोलण्याचा आवाज आला, 'साल्यांनो, जरा बेतानं. आपण आधी

उशीरा यायचं आणि मग एक क्षण थांबायला फुरसत नाही. शेजारीपाजारी लोक आहेत त्याचं काय ?' आणि मग आतून कडी काढली गेली. दार उघडलं गेलं. दारात एक अनोळखी तरुण उभा होता. पायापासून डोक्यापर्यन्त यांचे कपडे घातलेला. संतापाची एक सणक माझ्या मस्तकात निघाली. यांनी त्याचा हात घट्ट पकडला. हाताला झटका देऊन तो पळून जाऊ पहात होता. पण हमालानेही मदत केली. तो पळून जाऊ शकला नाही. त्याला घरात आणलं. यांनी हमालाला सांगितलं, ताबडतोब पोलीसाला बोलावून आण.' मग मात्र चोराचं अवसान गळालं. तो गयावया करू लागला. 'साहेब, पोलीसांच्या ताब्यात कशाला देता ? मी काय केलंय तुमचं ? एक जरी वस्तू हरवली असली तर मला ठाण्यात पोचवा, पण आधी बघून घ्या.' अरे, पण तू आमच्या घरांत शिरलास ते कशासाठी ? आमच्या घराचं संरक्षण करण्यासाठी ?' यांनी ओरडून विचारलं. 'पण साहेब, चोरलं तर नाही ना ? हे पहा साहेब, तुम्ही माझी सगळी हकीगत तर ऐकून घ्या. मग ठरवा काय करायचं ते.' तो म्हणाला. 'हो म्हणजे संधी साधून तुला पळून जायला बरं.'मी म्हणाले.'नाही नाही बाई, मी पळून जाणार नाही. वाटलं तर घराला आतून कुलूप लावून घ्या. तुमचं सामान बघून घ्या, माझी हकीकत ऐका.' तो विनवत होता. आत्ता कुठे माझं लक्ष घरात गेलं. सगळं घर रिकामं होतं. 'अगबाई, घरातलं सगळं सामान कुठे गेलं ?'मी किंचाळले. तो चोर ओशाळपणाने म्हणाला, 'इकडे या ना बाई, सगळं दाखवतो' जिथं घरातील हवा शुद्ध राखण्यासाठी झरोका होता, त्या खोलीत जिकडे तिकडे गाठोडी, पोती यांचा पसारा पडलेला होता. पोत्यातून चोरानं आमची भांडी भरून त्यांची तोंडं व्यवस्थीत बांधून ठेवली होती. माझ्या

साड्यांची गाठोडी बांधली होती. गाद्यासुद्धा दोरीनं बांधून ठेवल्या होत्या. पांघरूणं, चादरी यांची गाठोडी बांधली होती. सगळं काम कसं व्यवस्थित केलं होतं. त्याचं काम साधलं असतं तर आम्ही दिल्लीहून आल्यावर घर कसं चक्क आरशासारखं दिसलं असतं. कुठं सामानाचा डाग त्यावर उमटला नसता. चोराच्या सर्व मित्रांनी मध्यरात्री याला दोरानं बांधून झरोक्यातून आमच्या घरात सोडलं. आणि मग त्याच दोरीला बांधून सगळं सामान बाहेर न्यायचं ठरलं होतं. दरम्यान बाहेर गडबड झाली. सगळ्या सवंगड्यांना पळ काढावा लागला. पुन्हा ते रात्री येतील असं चोराला वाटलं. दिवसभर खपून त्यानं सगळं व्यवस्थित बांधून झरोक्याखाली आणून ठेवलं, पण दुसऱ्या दिवशीही कुणी आलं नाही. झरोका खूप उंच होता, त्यामुळे तिथे चढून पळून जाणं आतल्या चोराला शक्य नव्हतं. दारं खिडक्या तर इतक्या भक्कम की त्या तोडणंही शक्य नव्हतं; नाईलाज म्हणून त्याला घरात रहाणं भाग होतं. मग रोज स्वयंपाक करून तो आमच्या घरात जेवत होता. आमचेच कपडे वापरून तो आमच्या घरात रहात होता. रोज रात्री आपल्या सवंगड्यांची वाट पहात होता. पण चार–पाच दिवस झाले कुणी आलं नाही. बहुधा ते पकडले गेले असावेत. घरी गेल्यावर घराची साफसफाई करावी लागणार याची मला कल्पना होती. पण प्रवासाहून दमून आल्यावर अशा तऱ्हेने घर पुन्हा लावावे लागणार हे पाहून मी कपाळाला हात लावला. 'बाबा रे, चांगलं काम काढून ठेवलंस माझ्यासाठी' मी म्हटलं. चोर ओशाळला. एकतर तो नुकता–नुकताच या धंद्यात शिरला होता, शिवाय तो सज्जन होता. तो म्हणाला, 'मी सगळं करतो बाईसाहेब, पण तेवढं ते पोलिसांचं बघा ना. मी काही

चोरलं नाहीये तुमचं.''बरं, तू आधी आवर तर खरं, मग बघू.' मी म्हटलं. तत्परतेने तो कामाला लागला. प्रथम त्याने कपडे बदलून स्वत:चे कपडे घातले. मग माझ्याकडे येऊन तो म्हणाला, ' बाई, तेव्हढं दुधाचं पाहिलंत तर चहा करतो.' त्याला आम्ही घराबाहेर सोडणार नव्हतो. तेव्हा दुधाची सोय आम्हालाच करायला हवी होती. तोपर्यन्त त्याने पोत्यातली भांडी बाहेर काढून जिथल्या तिथे लावली. स्वयंपाकघर झाडून, पुसून, नटून, सजून पूर्वीप्रमाणे तयार झालं. एकीकडं तो इतर कामं उरकत होता. त्याने इतके सुंदर पोहे बनवले ! अगदी चविष्ट. चहाही सुंदर केला. चहापोहे आम्हाला खायला देऊन त्याने वरणभाताचा कुकर चढवला. बंबाला त्याने केव्हा पेटत घातलं होतं कळलंच नाही. आमचं खाणं होत आहे तोच पाणी तापल्याची त्याने वर्दी दिली. पोळ्याची कणिक भिजवून तो मग इतर सामान आवरू लागला. प्रत्येक वस्तू त्यानं जिथल्या तिथं ठेवली. मला आश्चर्य वाटलं. वास्तविक वस्तू चोरण्यासाठी त्यानं उचलल्या होत्या त्या कुठे होत्या हे लक्षात ठेवण्याचे याला काही कारणच नव्हतं. तो हुशार होता यात वादच नव्हता. काम कसं सुबकपणे करत होता. कुठलं काम आधी, कुठलं नंतर हे तो चतुरपणे ठरवत होता. स्वयं-पाकातही तो कुशल होता. थोड्याच अवधीत घर पुन्हा स्वच्छ, जसंच्या तसं पूर्वीप्रमाणे दिसू लागलं, स्वयंपाक तयार झाला. आमची जेवणंही झाली. आता या चोराचे काय करायचं ते ठर-वायला हवं होतं. त्याला घरात घेऊन आणि घराला आतून कुलूप लावून आम्ही आम्हालाच बंदीवान करून ठेवलं होतं, पण जरा झोपबीप झाल्यावर ठरवू असं म्हणून आम्ही अंग टाकलं. जाग आली ती पोरांच्या खिदळण्याने. कान देऊन ऐकू लागले. चोराची

आणि पोरांची चांगलीच गट्टी जमली होती. कसल्या कसल्या गोष्टी सांगून तो मुलांना हसवत होता. एकीकडे कपडे कपाटात लावण्याचे त्याचे काम चालू होते. आम्ही झोपलो होतो त्या दरम्यान आमचे प्रवासातले कपडे त्याने लख्ख धुवून टाकले होते. खरंच अजब चोर होता. कामाला इतका चांगला नोकर मिळाला तर काय बहार होती. माझ्या मनात विचार आला की खुशाल घराची जबाबदारी त्याच्यावर सोपवावी आणि निश्चितपणे आपण ऑफिसला जावं. पण हे कसं शक्य आहे? ज्यानं आमचं सारं सामान–सुमान चोरलं होतं, हो, म्हणजे चोरून आमच्याच घरात ठेवलं होतं, त्याच्यावर कसा भरवसा ठेवायचा? पण इतका चांगला माणूस कामाला मिळाला तर? हा विचारही सारखा मनात येत होता.

यांची झोप होते आहे तोवर चोरानं चहा बनवला. खरोखरीच त्याच्या इतका सुन्दर चहा कुणालाच येत नसेल. चहा झाला. आता या चोराचं काय करायचं ते ठरवायला हवं होतं. हे म्हणाले सुद्धा, 'हं मग काय चोरसाहेब? साहेबच म्हणायला हवं, कारण आमच्या घराची जबाबदारी तर तू अंगावर घेतली होतीस. मग काय, काय गं करायचं याचं? माझ्याकडे पहात ह्यांनी विचारलं. एकदम मला भीती वाटली. हे त्याला धक्का मारून घालवून देतील म्हणून. घरातले खरोखरच काही चोरीला गेलं नव्हतं म्हणून झटकन मी म्हटलं. 'आता राहू दे ना ते. उद्यापरवा बघू काय ते. आजच्या दिवस हा घरात राहिला तर माझा प्रवासाचा शीण तरी कमी होईल असा मी विचार केला. ह्यांनी पण मान्य केलं ते. चोराला त्याची माहिती आम्ही विचारली. त्याच नाव भिकू. खेड्यातला, अत्यंत दरिद्री, घरांत खूप माणसं,

शिक्षण अर्थातच नाही. पोटासाठी शहरात आला, आणि मग बारीकसारीक कामे करीत राहिला. कुठे हॉटेलात कपबशा विसळायला, कधी बांधकामावर वाळू वहायला, कधी धुणीभांडी आणि असंच काही काही. पण कुठेच स्थिरावला नाही. तरुण वय, चैनीची आवड वाढू लागली, पण पैसा कसा मिळणार ? आणि मग वाईट संगत लागली. बारीकसारीक चोऱ्या त्यानं यापूर्वी केल्या होत्या. पण गंभीर असं काही केलं नव्हतं. यापूर्वी त्याला शिक्षा वगैरे काही झाली नव्हती. एक गोष्ट माझ्या लक्षात आली. मनानं तो चांगला होता. गरीब असला तरी घरचे चांगले संस्कार होते. आणि मुख्य म्हणजे बुद्धीनें तो तल्लख होता. कुठलंही काम तो पटकन आत्मसात करी आणि ते अतिशय सुबकपणाने आणि कुशलतेने करी.



तो गेल्यावर ह्यांना मी माझा विचार सांगितला, भिकूला एकवार संधी द्यावी. जर आपण त्याला पोलिसात वगैरे दिला तर गुन्हेगार म्हणून त्याच्यावर कायमचा शिक्का बसेल. मग ही वाट सुटणे कठीण; त्याला आपल्याकडे कामाला ठेवून घ्यावा. रात्रीच्या शाळेत त्याचं नाव घालावं आणि कामाच्या बदल्यात त्याचं शिक्षण आणि रहाणं, खाणं याचा खर्च आपण करावा. आपलंही काम होईल आणि एका मुलाला सन्मार्गाला लावल्याचं पुण्यही पदरात पडेल.

माझं म्हणणं यांनाही पटलं. मग आम्ही भिकूला बोलावून घेतलं. त्याला तर आमचा विचार अतिशय आवडला. चोरी वगैरे करणार नाही अशी त्याने शपथ घेतली. तरीपण काळजी घेतलेली बरी. म्हणून आम्ही त्याची सर्व माहिती लिहून घेतली. त्याचा घरचा पत्ता, घरची माणसं, नंतर त्याच्या हाताचे ठसे घेतले आणि आमच्याजवळ कॅमेरा होताच. त्याचा एक फोटो घेऊन टाकला जर आमच्या घरातला सुतळीचा तोडा चोरीला गेला तरी आम्ही पोलिसांना सगळी माहिती कळवू, बोटाच्या ठशामुळं तर कुणीच माणूस सुटू शकत नाही असं आम्ही त्याला बजावलं. तो नीट वागला तर आमच्या घरातलाच एक माणूस अशी आम्ही वागणूक देऊ असं त्याला सांगितलं. त्याला सर्व मान्य होतं.

अशा तऱ्हेने चोर भिकू, आमच्या घरचाच भिकू बनून गेला. चांगलं खाणंपिणं, कपडेलत्ते संस्कारविचार आणि शिक्षण यामुळे तो नोकर वाटत सुद्धा नाही. त्याच्यावर जबाबदारी सोपवून मीही निश्चितपणे नोकरी करू शकते.

# पण पंख फुटलेच नाहीत

मिठूचं गाव होतं डोंगरावर, कडे, दऱ्या यांची गावातल्या लोकांना काहीच भीती वाटत नसे. कारण त्यांची मुलं रांगायला लागत ती उतारावरून आणि चालायला लागत ती चढणीवरून. गाव तरी केवढसं, तर पाचपंचवीस घरांचं. ना उद्योग ना धंदे, ना रस्ते ना वाहनं. कायम कसं शांत शांत. मोठा उद्योग होता तो मेंढ्या पाळण्याचा. अगदीच सोपा व्यवसाय. मुलंसुद्धा मेंढरांना चरायला घेऊन जात. कुठं जंगलात ती चुकतील नाहीतर दरीत पडतील याची घरच्यांना अजिबात भीती वाटत नसे. मिठू तर त्यामानाने पुष्कळच मोठा होता. चांगला तेरा चौदा वर्षांचा.

म्हणूनच लहान मुलांप्रमाणे, मेंढ्यांना घराच्या जवळपास न्यायला त्याला अजिबात आवडत नसे. सकाळी सकाळी तो आपली दिवसभराची भाकरी बरोबर बांधून घेत असे आणि मग तो आणि त्याची मेंढरे दिवसभर स्वच्छंदपणे खुशाल भटकत असत. जिथं कोवळं लुसलुशीत गवत मिळेल तिकडे तो मेंढ्यांना घेऊन जाई.

सगळ्यात त्याचं आवडतं ठिकाण होतं ते मऱ्या दरीपाशी. घरापासून खूप खूप उंच चढून जावे लागे. मग कितीतरी सपाट जमीन होती. तिथेच भरपूर गवत उगवायचं. सपाट जमिनी-मुळे मेंढ्यांच्या पिल्लांना छान बागडताही येत असे. सपाटी कुठे संपते हे मात्र अगदी जवळ गेल्यावरच समजत असे.

समोरची मऱ्या दरी जेव्हा दृष्टीला पडे तेव्हा डोळे गरकन फिरायचे. आधी सपाट जमीन आणि मग खोल खोल असलेली मऱ्या दरी. कुठे कडेकपारी नाहीत, काही नाही. सरळसोटपणे उभाच्या उभा कडा होता खालपासून वरपर्यन्त. अर्थात सगळ्यां-नाच तो माहिती होता. मऱ्या कड्यावरून जो आपलं पाऊल पुढे टाकील, त्याचा कपाळमोक्ष होणार, राई राई एवढे तुकडे होणार हे तर ठरलेलंच होतं.

त्या बाजूला कोणी फिरकतसुध्दा नसे. मिठ्ठूला मात्र तिची एवढी भिती वाटत नव्हती. त्या बाजूला गेलं नाही म्हणजे झालं. बाकीच्या सपाट जागेत हवं तेवढं गवत होतं म्हणूनच दरीपासून कितीतरी लांब तो बसत असे. आणि त्याच्या पलीकडे त्याची मेंढरं चरत असत. चुकून एखादं मेंढरू दरीकडे जाऊ लागलं तर त्याला ओलांडल्याशिवाय ते जाऊच शकत नसे. त्यामुळे मिठू पुष्कळ वेळा या भागात मेंढरं घेऊन आला तरी त्याचं एकही मेंढरू कधी दरीत पडलं नव्हतं.

मेंढ्यांची छोटी पिल्लं नेहमी इकडे तिकडे बागडायची. त्यांच्याकडं मिठू जास्त लक्ष देत असे. विशेषत: सगळ्यात छोटं असलेलं पाढरं पिल्लू खूपच बागडायचं. मिठ्ठूला ते फार फार आवडतं होतं.

कापसासारखं ते पांढरंशुभ्र होतं. म्हणून मिठू त्याला

'कापशा' म्हणायचा. कापशाही आईपेक्षा मिठूच्याच जवळपास बागडायचा, त्याला मिठूचं प्रेम कळायचं. डोंगर चढताना मिठू कापशाला छातीशी उचलून घेई दमेल म्हणून. उतरतानाही उचलून घेई पाय घसरेल म्हणून. जशी आणखी छोटी पिल्लं नव्हतीच त्याच्याजवळ. ती दमत आणि घसरतही नव्हती.



नेहमीप्रमाणे आजही मिठू मेंढरांना घेऊन मऱ्या दरीच्या सपाटीवर आला होता. दुपार झाल्यावर त्यानं आपलं जेवण उरकलं आणि मग तो झाडाला टेकून, पाय पसरून आरामात बसला.

हातात एक लांबलचक झाडाची फांदी त्यानं घेतली होती. एखादं मेंढरू मागच्या बाजूला जाऊ लागलं तर हाकलायला. नेहमीप्रमाणे मेंढरं चरत होती आणि तो जागरूकपणे त्यांच्यावर लक्ष ठेवत होता, अधूनमधून कापशा त्याच्याजवळ येत होता. मिठू त्याला पुन्हा माघारी हाकलत होता.

कधी नव्हे ती आजच मिठूला डुलकी लागली. अगदी दहापाच मिनिटंच. तो जागा झाला तो कापशाच्या आवाजानं. दुरून कापशाचा आवाज येत होता. जागा झाल्यावर क्षणभर त्याच्या काही लक्षातच आलं नाही. समोरच्या मेंढ्यात तो कापशाला शोधू लागला. मग एकदम तो भानावर आला आणि तो ताडकन उठला. कापशाचा आवाज येत होता तो मागून म्हणजे मऱ्या दरीतून. मिठू धावलाच.

कडा जवळ आला तसा तो रांगत रांगत पुढे जाऊ लागला दरीत घोंगावणाऱ्या वाऱ्यानं ओढून नेलं तर . . अगदी जवळ आल्यावर तर पालथा पडूनच तो सरपटत सरपटत जाऊ लागला. कापशाचा आवाज जवळ जवळ येत होता. केविलवाणेपणानं तो ओरडत होता. त्या लहानशा जिवालासुध्दा कळलं होतं त्याचं

शेवटी मिठू टोकाशी पोचला. त्याला कापशा दिसला. कड्याखाली दहा-वीस पावलांवर थोडासा दगड पुढे आला होता. त्याच्यावर कसलीशी झुडपं उगवली होती. पण त्यांची खोडं चांगली जाड झाली होती. अगदी चिवट वाटत होती ती झुडपं. त्याच्यावरच कापशा जेमतेम उभा होता. एखादा पाय घसरला असता तरी तो सरळ दरीत गेला असता.

कापशाला पाहून मिठूला काय करावं, त्याला कसं वाचवावं

त्याला कळेचना. खरे तर तो नेमका त्या झुडपात अडकला हे त्याचं सुदैवच होतं. पण त्याला वाचवणं अशक्य आहे हे मिठूला जाणवत होतं. इतक्यात एकदम भल्यामोठ्या गिधाडानं कापशाच्या जवळून गिरकी घेतली. बापरे, म्हणजे हे गिधाड कापशाला खाणार. केवळ पंख आहेत म्हणूनच. म्हणूनच ते गिधाड असा दुष्टपणा करणार. मला जर पंख असते तर ... तर मी कापशाला एका क्षणात उचलून वरती आणलं असतं.

मिठूच्या मनात असा विचार आला आणि त्या क्षणी त्याला असं जाणवलं, आपल्याला पंख आले आहेत. त्याने पंख हलवून पाहिले. क्षणात त्याचं शरीर हलकं झालं आणि तो अधांतरी तरंगू लागला. उडत उडत तो कापशापाशी पोचला. त्यानं पटकन कापशाला छातीशी घेतलं आणि तो उडू लागला. तो पुन्हा वरती आला. जमिनीवर उभा राहिला.

आपले पंख नाहीसे होत असल्याचं त्याला जाणवलं. त्यानं डावीकडे, उजवीकडे पाहिलं. त्याला पंख कुठे दिसलेच नाहीत. पंख आले ते जाणवलं पण डोळ्यांनी पाहिले नाहीत. काही का असेना, पंख आल्यापेक्षा कापशा वाचला याचाच त्याला खूप आनंद झाला. आता पुन्हा म्हणून कापशाला मोकळा सोडायचा नाही. चांगली लांब दोरी आणायची आणि त्याला बांधून ठेवायचं म्हणजे दोरी इतकाच लांब तो जाऊ शकेल.

घरी गेल्यावर त्यानं आई–वडिलांना सगळी हकीकत सांगितली. त्याला पंख फुटले होते याच्यावर कुणीच विश्वास ठेवला नाही. मऱ्या दरीकडे जाण्यापेक्षा त्यानं घरीच बसावं असं बापानं त्याला सांगितलं. दरीकडे पुन्हा जाणार नाही, असं त्यानं शंभर वेळा सांगितलं तेव्हा त्याच्या बापानं मेढ्या न्यायची

परवानगी त्याला दिली. शिवाय घरात एकटा बसून तो करणार तरी काय होता ? त्याच्या घरातच काय पण साऱ्या वस्तीतसुद्धा दिवसा कुणी नसायचं. जो तो आपापल्या उद्योगाला गेलेला.

दुसऱ्या दिवसापासून बापाच्या सांगण्याप्रमाणं मिठू इतर मुलांच्या बरोबर घराच्या जवळपास मेंढ्या चरायला नेऊ लागला. पंख फुटल्याचं आणि कापशाला बाचवल्याचं त्यानं आपल्या मित्रांना सांगितलं. सगळ्यांनी त्याला वेड्यातच काढला. माणसांना असे कधी पंख फुटल्याचं कुणी ऐकलंसुद्धा नव्हतं. कुणीच मिठूवर विश्वास ठेवत नव्हतं.

मिठूवर कुणी विश्वास ठेवत नव्हतं. म्हणूनच की काय, पुन्हा अेकदा मऱ्या दरीकडे जायची आणि पंख फुटतात की काय हे पहाण्याची अनावर इच्छा त्याला होत होती. पण बापानं तिकडं जायला त्याला मना केलं होतं. या पोरांच्यात आपण नसलो तर ती बापाला नक्कीच सांगणार होती. म्हणूनच तो आपली इच्छा दाबून ठेवत होता.

पण रोजच्या रोज तिकडे जाण्यासाठी त्याचं मन धाव घेत होतं. शेवटी पुन्हा एकदा ... फक्त एकदाच मऱ्या दरीकडे जायचं आणि कड्याच्या टोकावर बसून पंख येतात काय ते पहायचं असं त्यानं ठरवलं. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणं त्यानं आपली भाकरी बांधून घेतली. कापशाला बांधायला तो दोरी शोधू लागला. दोरी सापडली ती जाड, रहाटाला बांधतात तसली. ती हळूच त्यानं आपल्याबरोबर घेतली आणि घराबाहेर पडल्यावर मग ओरडून आईला 'जातो' म्हणून त्यानं सांगितलं.

मऱ्या दरी जशी जवळ आली तशी त्याची छाती उगीचच धडधडू लागली. शेवटी तो सपाट मैदानावर पोचला. पुष्कळ दिव-

सांत तो या बाजूला आला नव्हता. त्यामुळे सगळीकडे खूप गवत वाढलं होतं. त्यानं मेढयांना चरायला सोडलं. कापशाला झाडाशी बांधलं आणि मग तो दरीकडे वळला.

हळूहळू तो दरीकडे जात होता. त्याला असं जाणवलं, कुणी तरी ओरडतंय. मदतीसाठी हाका मारतंय. दरीतूनच आवाज येतोय, अगदी क्षीण. अधूनमधून. तो जवळ जवळ जाऊ लागला. मागच्याप्रमाणे गुडघ्यावर रांगत तो पुढे सरकला आणि मग पालथा पडून चक्क सरपटत तो कडयाच्या टोकाशी जाऊन पोचला. त्यानं खाली डोकावून पाहिलं.

खरंच, एक माणूस त्या झुडपांना धरून दरीत लोंबकाळत होता. कसा या बाजूला आला कोण जाणे. नेमका या दरीत पडला. झुडपं तरी हाताला लागली म्हणून बरं. पण त्याची काय भयानक अवस्था झालेली असेल. किती वेळ झुडपं पकडून तो लोंबकळणार. खाली डोळे फिरवणारी दरी.

आत्ता पंख असते तरी मी या माणसाला उचलून आणू शकणार नव्हतो. तो माणूस पुन्हा एकदा क्षीण आवाजात म्हणाला, ‘ देवा धाव, मला वाचव. ’ मिठूला कळेना काय करावं ते. घरी परत जाऊन कुणाची मदत आणावी तर तोपर्यंत हा माणूस दरीत कोसळणार. आणि माणसं तरी त्याला वर कशी काढणार ? दोर सोडला तरी त्याचे हात कुठे रिकामे आहेत तो पकडायला ?

खरंच, मला पंख असते तर... तर मी त्याला दोरीनं बांधू शकलो असतो. आणि क्षणात मिठूला जाणवलं. त्याला पंख फुटत होते. त्यानं दोन्ही बाजूला पाहिलं, पंख दिसत नव्हते पण ते फुटले होते नक्की. त्याला आनंदाचं भरतं आलं. तो उडत उडत कापशा-जवळ गेला. त्याला मोकळा करून त्याच्या आईजवळ सोडलं आणि

दोर घेऊन तो उडत उडत पुन्हा दरीपाशी आला.

दरीत उतरला. त्या माणसाजवळ पोचला. त्यानं त्या माणसाला सांगितलं, झुडपं गच्च पकडून ठेवा थोडावेळ. मी दोरानं बांधतो तुम्हाला. मग वर जाऊन हा दोर झाडाला बांधतो. मी सांगेन तेव्हाच दोर सोडायचा. मग दोराला धरून वर चढायचं.

त्या माणसाला मिठू देव वाटला की भूत वाटला कोण जाणे. त्या वेळेस तरी काही बोलण्यात वेळ दवडणं शक्य नव्हतं. मिठूनं भराभर त्या माणसाच्या कमरेला आणि दोन्ही खांद्यांवरून दोर आवळला. उडत उडत तो वरती आला. जवळच्या झाडाला त्यानं दोराचं दुसरं टोक गच्च बांधलं आणि मग त्या माणसाला झुडपाचे हात सोडून दोर पकडायला सांगितलं.

देवाचं नाव घेऊन त्यानं झुडपाचे हात सोडले आणि दोर पकडला. झुडपाचे हात सोडल्यावरही आपण जिवंत आहोत हे पाहून तो म्हणाला, 'परमेश्वरा, तू आहेस म्हणून मी वर येऊ लागलो.' मिठूला जाणवू लागलं त्याचे पंख नाहीसे होत आहेत. त्याला ते दिसत नव्हते. पण त्याला ते थोडा वेळ मिळाले होते हे नक्की. याचा पुरावा म्हणजे तो समोरून दरीबाहेर येणारा माणूस.

पण त्यानं हे कुणालाच सांगितलं नाही. कुणी विश्वास ठेवणार नाही हे तर झालंच, पण बापाला कळलं असतं तर त्यानं तंगड मोडून टाकलं असतं. दुसऱ्या दिवशी तो नेहमीप्रमाणे इतर मुलांबरोबर मेंढ्या घेऊन गेला. काल कुठे गेला होता याची मुलांनी चौकशी केली. त्यानं थाप ठोकली, जरा आणखीन खालच्या बाजूला गेलो. तरी एकानं विचारलंच, पंख आणायला गेला होता का म्हणून, मिठूनं काहीच उत्तर दिलं नाही.

पंखांच्या या भानगडीमुळे मिठू एकटा पडला होता. कुणाशी

पंखांबद्दल बोलणं शक्य नव्हतं. पण पंखांच्या विचाराशिवाय त्याचा एक क्षणही जात नव्हता. मुलांच्यात असूनही तो खेळत नव्हता. हसत, बोलत नव्हता. एकटाच स्वतःशी विचार करीत रहायचा. थोडे दिवस असेच गेले. पुन्हा मिठूला मऱ्या दरीची खूप खूप ओढ लागली. तसं तर रोज च त्याला तिकडे जावंसं वाटायचं, पण आता अगदी तिकडे गेल्याशिवाय त्याला रहावत नव्हतं. शिवाय गेलं तर काय झालं, असं त्याला वाटत होतं. येऊन-जाऊन भीती कसली तर दरीत पडायची आणि मरायची पण ती भीती मिठूला वाटण्याचं कारणच काय होतं ? त्याला तर पंख फुटत होते. त्याला उडता येत होतं. रोज-रोज तो तिकडे गेला तरी काहीच बिघडणार नव्हतं. फार तर बाप रागावेल. पण त्यालाच एकदा मऱ्या दरीशी नेऊन दाखवलं पाहिजे.

दुसऱ्या दिवशी मिठू पुन्हा मऱ्या दरीवर गेला. कापशाला बांधून ठेवलं, मग नेहमीप्रमाणे आधी चालत, मग रांगत आणि शेवटी सरपटत तो कड्याच्या टोकाशी पोचला. दरी अगदी शांत होती. दरीत फारसं वारंही घोंगावत नव्हतं. कितीतरी वेळ मिठू दरीकडे पहात राहिला. आज त्याला पंख फुटले नव्हते. दुसरा दिवस उजाडला. पुन्हा मिठू मऱ्या दरीकडे गेला. कड्याच्या टोकाशी पालथा पडून तो मऱ्या दरीचं निरीक्षण करत राहिला. दरीचं का त्याला आकर्षण वाटत होतं कोण जाणे. पंख त्याला येत नव्हते आणि उद्या पुन्हा एकदा तिथे जाऊन येण्याचा त्याला मोह होत होता. रोजच मिठू मऱ्या दरीकडे जाऊ लागला. बरोबरीच्या मुलांना त्याची उणीव फारशी जाणवली नाही. अलीकडे मिठू त्यांच्यात फारसा मिसळत नव्हता. बापही चौकशी करत नव्हता. पंख फुटल्याचं मिठूनं त्याला सांगितलं होतं त्याला फार दिवस

झाले. बाप ते सगळं विसरूनही गेला होता.

रोजच मऱ्या दरीकडे मिठू जात होता. पण तिकडे जाण्याची रोज रोज त्याला ओढ लागत होती. कड्याच्या टोकाशी जाऊन पंख फुटतात का ते पहात तो तासन तास पडून राही. विचार करता करता त्याच्या असं लक्षात आलं की जरूर असेल तेव्हाच त्याला पंख फुटले होते. अशी जरूर नेहमी नेहमी कशी निर्माण होणार ? या दरीकडे आधी कुणी फिरकणारच नाही. फिरकलं तरी पडणार नाही. आणि पडलं तरी नेमकं या झुडपात पडणं कठीणच. असं केलं तर, आपणच या झुडपात उतरलो तर ? मग तरी पंख फुटतीलच की, या विचारानंच त्याला घाम फुटला. त्या भयंकर मऱ्या दरीत आपण होऊन उतरायचं आणि पंख नाही फुटले तर...? पण पंख फुटणारच – मिठूची खात्री होती.

अखेर रोज रोज विचार करकरून दरीत उतरायचा निश्चय मिठूनं केला. भलामोठा दोर होताच. दोराचं एक टोक त्यानं झाडाला घट्ट बांधलं. दुसऱ्या बाजूनं त्यानं स्वत:ला बांधून घेतलं आणि मग तो दोराला धरून हळूहळू दरीत उतरू लागला. कड्याला चिकटून उभा राहिला. 'मला पंख असते तर...' असं तो अनेकदा म्हणाला. पण त्याला पंख फुटलेच नाहीत.

पंख का फुटले नाहीत बरं ?... तो विचार करू लागला. खरंच, दोरीने बांधल्यामुळे मला पंखांची सध्या जरूर नाहीये. पंख हवे असतील तर दोर सोडायला हवा. पंखांच्या कल्पनेनं मिठू झपाटून गला होता. त्यानं स्वत:भोवती बांधलेला दोर हळूहळू सोडून टाकला. एकदम काय झालं कोण जाणे. मिठूचा पाय निसटला. त्याचं भवितव्य स्वच्छ होतं. मरण. त्यापासून त्याला कोण वाचवणार ? फक्त पंख. पण पंख त्याला फुटलेच नाहीत.

मऱ्या दरीत एक हृदयाला भेंदणारी किंकाळी उठली. मिठूची सगळी मेंढरं घास टाकून स्तब्ध झाली. मिठूला का नाही पंख आले? त्याने स्वतःच संकटात उडी घेतली म्हणून, की कड्याच्या त्या विशिष्ट दगडावरून त्यानं इच्छा केली नाही म्हणून?

# ढाण्या

आम्ही नवीन वसाहतीत रहायला आलो. वस्तीच्या शेवटी आमची वसाहत होती. जवळून ओढा वहात होता. मोकळी हवा, गोंगाट नाही, रहदारी तुरळक, त्यामुळे बरं वाटत होतं. पाहुणे-राउळेही कमी यायचे. इतक्या लांब काहीच मिळत नसे. ना बस, ना रिक्शा, सिनेमा नाही, नाटक नाही.

आमच्या बाजूला माणसांची ये–जा कमी असली तरी प्राणी मात्र बरेच होते. गोठे जवळच होते. त्यामुळे गाई-म्हशी होत्याच. दिवसातून दहावीस वेळा त्यांच्या गळ्यातल्या किणकिण-णाऱ्या घंटांचा गोड आवाज करीत त्या इकडून तिकडे गवत खाण्यासाठी, ओढ्यात डुंबण्यासाठी जात. जवळ टांगेवाल्यांचीही वसाहत होतीच. त्यामुळे दिवसाच काय पण रात्रीसुद्धा घोड्यांची जा-ये चालू असायची. शेळ्या तर कितीतरी होत्या. त्यांच्या-बरोबर त्यांची मिटुकली काळी पिल्लं हरणासारखी बागडत धावायची. डुकरं तर बघायलाच नकोत. सतत त्यांचा एकच

कार्यक्रम : खाली बघून मिळेल ते खाणं. समोर बघणारी डुकरं असतील की नाही शंकाच आहे. पण एकाच वेळी दहा–बारा चिटच्या पिल्लांना घेऊन जाणारी डुकरीण बघाविशी वाटायची. तिची पिटुकली पिल्लंसुद्धा गोड दिसतात. गाढवं दुगाण्या कशा झाडतात, तेही इथंच बघायला मिळालं. बेडकांचे किती प्रकार आमच्या इथे होते. आणि त्याबरोबरच आले सर्पराज. अधून–मधून सापही निघायचे. मांजरं कुत्री तर बऱ्याच जणांनी पाळली होती.

माणसं फारशी आमच्याकडे येत नसत म्हटलं पण त्यांची एक जात मात्र अधूनमधून आमच्या वसाहतीला भेट देत असे. रात्री गस्त असे ती चोरांची, पोलीसांची नव्हे. त्यामुळेच आम्ही-सुद्धा तल्लख कुत्री पाळली होती. आमच्याच घराची काय, सगळ्या वसाहतीचीच राखण रॉकी आणि जॉनी करायचे. आमच्या सोसायटीला समोर, रस्त्याच्या बाजूला भिंतीचं कंपा-उंड घातलेलं होतं. पहिली, दुसरी आणि तिसरी अशी घरांची रांग भिंतीमागे होती. पहिल्या रांगेच्या शेवटी भिंतीला फाटक बसवलं नव्हतं. चांगली वीस पंचवीस फूट जागा मोकळी सोडली होती. तिथून घरांच्या तिसऱ्या रांगेपर्यन्तचा रस्ता होता. आणि पुन्हा डावीकडे भिंत होती.

सगळ्या सोसायटीत रॉकी जॉनीचं राज्य असलं तरी या रस्त्यावर मात्र ढाण्याचं साम्राज्य होतं. ढाण्या समोरून चाल करून आला की राकी-जानी पायांत शेपटी घालून ढाण्याच्या साम्राज्यातून चालते होत. ढाण्या म्हणजे अगदी पांढरा शुभ्र लाल तुरेवाला आमचा कोंबडा. हो, चक्क कोंबडा. खरं तर कोंब-ड्यांना भीती मांजरांची, आणि मांजरांना कुत्र्यांची. पण इथे

आमचा ढाण्याँ मात्र कुत्र्यांनासुद्धा पिटाळून लावायचा.

एकदा दुसरी कुणाची एक काळी कुत्री आमच्या सोसायटीत शिरली. तिला माहीतच नव्हतं इथलं ढाण्याचं साम्राज्य. ती दिसल्याबरोबर ढाण्या चाल करून आला. पण तिच्यावर काहीच परिणाम झाला नाही. मग स्वारी तिरकी तिरकी चालत आली आणि चक्क तिच्या पाठीवर उडी टाकली. त्याबरोबर घाबरून केकाटत ती पळून गेली. ढाण्याचा आणखी एक विशेष म्हणजे त्याला खुराड्यात रहायला अजिबात आवडत नसे. दिवसभर तो घरात किंवा रस्त्यावर मुक्तपणे हिंडत असे. आणि रात्री चक्क तो झाडावर झोपत असे. झाडाची ती फांदी चांगली बारा-पंधरा फूट उंच होती. पहाट झाली की ढाण्या 'कुकू च कू' करून बांग द्यायचा.

आधीच विरळ असलेली रहदारी संध्याकाळ झाल्याबरोबर थांबत असे. आणि मग भीती वर डोकं काढायची – चोरांची, सापाची, रात्री कुत्र्यांच्या भुंकण्याचा धुमाकूळ चाललेला असायचा. मधेच घोड्यांच्या फुरफुरण्याचा आवाज आणि रातकिड्यांची किरकिर.

त्या रात्री असंच झालं. रॉकी जॉनी भुंकू लागले. कुणीतरी आलं असावं. पण रस्त्यानं जाणाऱ्या-येणाऱ्यावर सुद्धा ते रात्री भुंकत. त्यामुळं कुणी फारसं लक्ष दिलं नाही. पण बराच वेळ झाला तरी त्यांचं भुंकणं संपेना. आता भुंकण्याची पद्धतही बदलली होती. वेगवेगळ्या वेळी भुंकण्याची त्यांची पद्धत वेगवेगळी होती. त्यामुळेच माझ्या लक्षात आलं. आता त्यांच्या भुंकण्याचं कारण वेगळं आहे. पण काय असावं याचा तर्क करता येईना. थोडा वेळ वाट पाहिली. पण अजूनही त्यांचं भुंकणं थांबेना. शेवटी काय

आहे ते पहावं असा विचार करून मी दार उघडलं. अंगणात रस्त्यावरच्या दिव्यांचा स्वच्छ उजेड पडला होता. रॉकी आणि जॉनी आवेशात येऊन भुंकत होते. आणि त्यांच्या मध्ये होता एक साप.

बापरे, मी तर घाबरून गेले. आता हा कुणाच्या घरात शिरला तर ? मारणार तरी कोण ? रॉकी–जॉनीच्या भुंकण्यानं तो काही मरणार नाही. पण एक गोष्ट खरी, तो त्याच्या चालीनं चालत नव्हता. मोठ्या प्रयासानं हळू हळू पुढे सरकत होता. क्षणात हे सगळे विचार माझ्या मनात येऊन गेले. दुसऱ्या क्षणी फडफड आवाज झाला आणि सापावर कुणीतरी झेप टाकली. अगबाई, ढाण्या. नक्कीच ढाण्यानं सापाला जखमी केलं असणार. नाहीतर तो कधीच झरझर निघून गेला असता. आरडाओरड करून आजूबाजूच्या लोकांना मी उठवत होते. आणि इकडे लढाई चालूच होती. ढाण्याची आणि सापाची. ढाण्या बाजूला जात होता आणि पुन्हा उडत उडत येउन सापाला चोच मारत होता. ढाण्या आला की सापही त्याला चावण्याचा प्रयत्न करीत होता.

रॉकी–जॉनी जोरजोरात भुंकत होते. काही मंडळी उठून आली. साप पाहिल्यावर भराभर धोंडे आणून सापाचा पार निकाल लावून टाकला त्यांनी. मग जवळ जाऊन सापाचं निरीक्षण करणं, ढाण्याचं कौतुक करणं यात मंडळी गर्क झाली. मी मात्र परत वळले घरात जाण्यासाठी आणि आत्ता माझ्या लक्षात आलं. माझ्या दारापासून लाल थेंबांची रांग लागली होती. पाय लावून पाहिला. ते थेंब ओले होते. याचा अर्थ ... मी एकदम किंचाळले. रक्ताचे थेंब. ओले रक्ताचे थेंब ... नक्कीच अंधारात कुणीतरी असणार. मी किंचाळल्यामुळे काहीजण माझ्याकडे धावून आले.

खरंच, ते ओले रक्ताचे थेंब होते. माझ्या दारापासून डावीकडे ते अंधारात लुप्त झाले होते. कुणीतरी दरडावून विचारलं. 'कोण आहे अंधारात ?' कुणीच उत्तर दिलं नाही. मग टॉर्च आणला गेला. टॉर्चच्या उजेडात दिसलं, क़ोपऱ्यातल्या अंधारात एक माणूस डोकं दाबून बसला होता. 'कोण आहे तो ?' या प्रश्नालाही त्या माणसानं उत्तर दिलं नाही. पण तो काही हालचालही करत नव्हता. त्यामुळे धीर येऊन आम्ही त्याच्या थोडं जवळ गेलो.

'क़ोण रे तू?' आम्ही पुन्हा विचारलं. आम्ही त्याच्याजवळ आल्यामुळे त्याला उत्तर देणं भागच होतं. 'कुनी न्हाई ज़ी, मी हाय'. तो म्हणाला, 'तू आहेस ना, मग कुणी नाही काय म्हणतोस ? आणि इथं काय करतोयस तू ?' पुन्हा 'काही न्हाई जी' तो म्हणाला. त्याचा आवाज अगदी खोल वाटत होता. मी म्हटलं, याला फार लागलं असलं तर आधी काही औषधपाणी करायला हवं.

कशानं रक्त आलं विचारलं तर म्हणाला, 'आवं, तुमचं ते कोंबडं, त्यानंच टचकन की वो चोच मारली.' 'अरे, पण तू इथं कशाला आलास मग आमच्या दाराशी ? दाराशी आलास म्हणूनच त्यानं चोच मारली ना ? काय चोरीबीरी करायला आलास की काय ?' मी म्हटलं. 'न्हाई जी, उगं आपलं काय खायला भेटतं का पघत व्हतो.' 'म्हणजे चोरीच करायला आलास ना ?' 'नाई जी, न्हाई जी' 'मग सांग खरं काय ते. नाहीतर पोलीसात देतो तुला' आम्ही त्याला खडसावलं.

तो घाबरून गेला. गयावया करत म्हणाला, 'सगळा सांगतो जी, पर येवढं या जखमेला काही ओषाद पानी करतावं. तुमचं क़ोंबडं–' असं म्हणून तो शिवी देवू लागला. आम्ही त्याला

चांगलाच सुनावला. ' ए चोरा, कोंबडं बिबडं म्हणून त्याला शिव्या देऊ नको. आमचा ढाण्या आहे तो ढाण्या'.

आमच्या सोसायटीतल्या डॉक्टरांना आम्ही बोलावून आणलं त्यांनी चोराची जखम बांधून टाकली. मग आम्ही त्याला फर्मावलं, ' सांग आता काय झालं ते. ' कारण ढाण्याचा पराक्रम पहाणारा तो एकटाच माणूस होता. ढाण्यानं पराक्रम गाजवला. पण त्याला तो थोडाच सांगता येणार होता?.

चोर तीन दिवसांचा उपाशी होता. कुठे कामधंदा मिळत नव्हता. भीक मागायला लाज वाटत होती. शेवटी कुठं काही बारीकसं सामान उचलावं, काही कपडे किंवा बाहेर विसरून राहिलेलं सामान लंपास करता आलं तर पहावं, म्हणून तो आला होता. त्यानं सोसायटीच्या रस्त्यावर पाय ठेवल्याबरोबर कुत्र्यांनी भुंकून गदारोळ केला. कसाबसा तो आमच्या घराजवळ पोचला आणि इतक्यात आमच्या ढाण्यानं टचकन त्याला चोच मारली. काय झालं ते त्याला कळेचना.

पक्षी कधी चोची मारतात, हे त्यानं ऐकलंच नव्हतं. कोंबडा कधी झाडावर झोपतो हे त्यानं पाहिलंच नव्हतं. पण आता मात्र प्रत्यक्ष अनुभवाला आलं होतं. आधीच उपाशी आणि त्यातून चोच मारल्यामुळे डोक्यातून रक्ताची धार लागलेली. त्याला चक्करच आली. डोकं धरून तो खाली बसला. आता हे कोंबडं चोची मारून मारून आपलं डोकं फोडणार आणि ही कुत्री लचके तोडून तोडून आपल्याला ठार मारणार असं त्याला वाटू लागलं.

' पर बाईसाब, त्या सापामुळं म्या वाचलं पघा.' तो चोर सांगत होता. कारण इतका वेळ त्याच्यावर धावून धांवून भुंकणारी कुत्री एकाएकी परतली आणि भुंकतच राहिली. कोंब-

ड्याच्या टोकदार चोचीनं परत हल्ला होतोय की काय, याची वाट पहात तो डोकं गच्च धरून बसला होता. पण कोंबडा आलाच नाही. मग कुत्री कुणावर भुंकतात हे तो पाहू लागला. साप मध्ये होता. दोन्ही कुत्री त्याच्यावर भुंकत होती आणि कोंबडा सापाला टोची मारत होता.

बिच्चारा साप. जणू तो चोराला वाचवायला आला होता. पण स्वतःच मरून गेला. पण ढाण्याचा पराक्रम ऐकून छोटी मंडळी ढाण्याचा जयजयकार करू लागली.' ढाण्याकोंबडा झिंदाबाद.' खरोखरच, माणसाला लाजवील असा पराक्रम ढाण्यानं आज गाजवला होता. या सगळ्या कौतुकावर त्याचा हक्कच होता.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. 9658 दिनांक 3/5/7
विषय बाल क्र. ........

BVBK-0401784